cmyk

## संपादकीय

# निवडणुकीतील महाघोटाळा!

लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत मॅचफिक्सिंग झाल्याचा आरोप केला आहे. मॅचफिक्सिंग हा शब्द क्रिकेटने लोकप्रिय केला आहे. क्रिकेटमध्ये सामन्याचा निर्णय निश्चित करण्यासाठी जे घोटाळे करण्यात आले त्याला मॅचफिक्सिंग असे म्हटले जाते. असे करण्यासाठी पैसे घेऊन मुद्दाम नोबॉल टाकणे, वाईड चेंडू टाकणे, झेल सोडणे, असे प्रकार केले गेले. पैशाच्या लोभापोटी असे प्रकार घडले. मॅचफिक्सिंगची वाळवी राजकारणातही शिरली. सत्ताधा-यांनी पुन्हा सत्तेवर येण्यासाठी जे घोटाळे केले त्याचे नाव मॅचफिक्सिंग. महाराष्ट्राच्या निवडणुकीत मॅचफिक्सिंग झाल्याचा आरोप राहुल गांधी यांनी केला.


दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-४९ | गुरूवार, दि.१२ जुन २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये


## सर्वच शाळांच्या वेळापत्रकांमध्ये बदल

मुंबई : येत्या १६ जून पासून महाराष्ट्र राज्य बोर्डाच्या शाळांचे नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होणार आहे. राज्यातील २५ जिल्ह्यामधील शाळा या १६ जूनपासून सुरु होतील तर विदर्भातील ११ जिल्ह्यातील शाळा या २३ जूनपासून सुरु होणार आहेत. महाराष्ट्रातील विदर्भ विभागातील नागपूर, अमरावती, चंद्रपूर, अकोला, वर्धा, बुलढाणा, यवतमाळ, भंडारा, गोंदिया, वाशीम, आणि गडचिरोली हे ११ जिल्हे वगळता राज्यातील २५ जिल्ह्यांमधील शाळा १६ जून पासून सुरू होतील. तसेच विदर्भातील जिल्ह्यांमधील शाळा २३ जून पासून सुरू होणार आहे. मात्र विदर्भातील शाळा या सुरुवातीला सकाळ-सत्रामध्ये भरवल्या जातील आणि त्यानंतर या शाळा नियमित भरतील. तर राज्यातील शाळा आता सकाळी नऊ ते सायंकाळी चार पर्यंत सुरु राहतील.

## थोडक्यात...

### एअरटेलने १.८० लाख संशयास्पद लिंक्स ब्लॉक केल्या

मुंबई-ऑनलाइन फसवणुकीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर, दूरसंचार क्षेत्रातील प्रमुख कंपनी भारती एअरटेलने बुधवारी दावा केला की त्यांनी कर्नाटकमध्ये त्यांची अपग्रेडेड फसवणूक शोध प्रणाली सुरू केल्यानंतर अवघ्या २५ दिवसांत १.८० लाखांहून अधिक लिंक्स ब्लॉक केल्या आहेत.

### वैष्णवी हगवणे प्रकरणाची राज्य विधीमंडळाकडून दखल

मुंबई-पुण्यातील वैष्णवी हगवणे प्रकरणाची राज्य विधीमंडळाकडून दखल घेण्यात आली आहे. वैष्णवी हगवणे प्रकरणी विधीमंडळाच्या समितीपुढे प्रथम सुनावणी असून संबंधितांना सविस्तर अहवाल सादर करण्याची सूचना. सुनावणीत पोलीस महासंचालक, गृहविभाग सचिवांची साक्ष नोंदवण्यात आली आहे.

### अजितदादांशी वाद नाही-संजय शिरसाट

संभाजीनगर-ज्यावेळी संवाद होतो, त्यावेळी वादाला अर्थ उरत नाही, असे म्हणत मंत्री संजय शिरसाट यांनी अजितदादांशी वाद नसल्याचे म्हटले आहे.

### आई तुळजाभवानीला राणेंकडून कमळाचे फुल अर्पण

तुळजापूर-खासदार नारायण राणे यांच्याकडून आई तुळजाभवानीला कमळाचे फुल अर्पण केले. राणे यांनी सह कुटुंब आई तुळजाभवानी देवीच दर्शन घेतले. आई तुळजाभवानी देवीच दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले. नारायण राणेंच्या हस्तेआई तुळजाभवानी देवीची महा आरती करण्यात आली. तुळजाभवानी मंदिर संस्थान कडून राणे कुटुंबियांचा सत्कार करण्यात आला.

### चांदीच्या दरात तब्बल २२०० रुपयांची वाढ

जळगाव-चांदीच्या दराने पुन्हा नव्या उच्चांक गाठला आहे. जळगाव सराफा बाजारात चांदीच्या दरात तब्बल २ हजार २०० रुपयांची वाढ झाली आहे. चांदीचे दर जीएसटीसह १ लाख १० हजार ४१६ रुपयांवर पोहचला आहे.

### राज्य उत्पादन शुल्क विभागात १३७ पदांची भरती

मुंबई-राज्य उत्पादन शुल्क विभागातील लिपिक संवर्ग व जवान संवर्गातील कर्मचाऱ्यांना दुय्यम निरीक्षक गट क पदावर निवडीद्वारे नियुक्ती देण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरती मोहीम राबवली जाणार आहे. दुय्यम निरीक्षक व लिपिक पदाचा एकूण १३७ रिक्त जागा भरण्यासाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे.

### राज्यात कोरोनाच्या नवीन ८९ रुग्णांची नोंद

मुंबई-राज्यात मंगळवारी कोरोनाच्या नवीन ८९ रुग्णांची नोंद झाली आहे. यामध्ये सर्वाधिक रुग्ण मुंबई ३२ पुणे महापालिका २३ आणि पिंपरी चिंचवड ९ या क्षेत्रातून आहेत. जानेवारीपासून एकूण १५९३ रुग्ण आढळले असून त्यापैकी ९५९ रुग्ण पूर्णपणे बरे झाले आहेत. सध्या राज्यात ६१५ रुग्ण सक्रिय असून त्यापैकी बहुतेक रुग्ण घरीच विलीनीकरणात उपचार घेत आहेत.

# जात-पात न पाहता शेतकऱ्यांनी रस्त्यावर उतरावं

## अन्नत्याग आंदोलन; बच्चू कडूंच्या मदतीला जरांगे धावले





**आमरावती । वृतसंस्था**

**शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याच्या प्रमुख मागणीसह इतर मागण्यांसाठी प्रहारचे प्रमुख व माजी मंत्री बच्चू कडू हे अन्नत्याग आंदोलन करीत आहेत. त्यांच्या या आंदोलनाकडे सरकारने कानाडोळा केला असला तरी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे त्यांच्या मदतीला धावून गेले आहेत. बच्चू कडू यांच्या मागण्या मान्य केल्या नाही तर त्याचे परिणाम सरकारला भोगावे लागतील असा इशारा त्यांनी दिला. तसेच शेतकऱ्यांनी जात-पात न पाहता रस्त्यावर उतरावं लागेल, असेही ते म्हणाले.**

माजी मंत्री आणि प्रहार संघटनेचे प्रमुख बच्चू कडू हे अमरावती जिल्ह्यातील गुरुकुंज मोझरी येथे अन्नत्याग आंदोलन करत आहेत. शेतकरी, कष्टकरी, कामगार, महिला यांच्या वेगवेगळ्या मागण्यांना घेऊन ते आंदोलनाला बसले आहेत. मनोज जरांगे यांनी बच्चू कडू यांची भेट घेतली. यावेळी जरांगे यांनी बच्चू कडू यांच्या आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला. तसेच त्यांना तब्येतीची काळजी घ्यायला सांगितली. यावेळी जरांगे म्हणाले, शेतकऱ्यांचे नेते बच्चू कडू हे गोरगरीबांसाठी अनेक वर्षांपासून संघर्ष करत आहेत. तुम्ही तब्येतीची काळजी घ्या. तुम्ही एकटे नाहीत, आम्ही तुमच्यासोबत आहोत. एखाद्या विषयाला न्याय मिळवायचा असला तर रस्त्यावर उतरावं लागतं. त्यामुळे शेतकऱ्यांनी रस्त्यावर उतरायला हवं, असे आवाहन मनोज जरांगे यांनी शेतकऱ्यांना केले.

### “ शरद पवारांचा बच्चू कडू यांना फोन



शरद पवार यांनी काल (मंगळवार) बच्चू कडू यांना फोन करत त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली. तसेच आंदोलनाबाबत माहिती विचारली. यावेळी बच्चू कडू यांनी सांगितले की, कलेक्टर आणि एसपी भेटायला आले होते, तसेच पालकमंत्र्यांशी बोलणे झाले आहे. त्यांनी मुख्यमंत्र्यांसोबत मीटिंग आयोजित करुन देऊ अशी माहिती दिली आहे. मात्र मी मीटिंगच्या बदल्यात उपोषण मागे घेणार नाही. आम्हाला भेट नको, निर्णय हवा आहे. यानंतर बच्चू कडू यांनी तुमच्याकडून उद्या आंदोलनाची माहिती घेण्यासाठी आले तर बरे होईल असे म्हटले आहे.

### “ खा.बजरंग सोनवणेंचाही पाठींबा



बीडचे खा. बजरंग सोनवणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवून बच्चू कडू यांच्या मागण्यांची तात्काळ दखल घ्यावी, अशी मागणी करून प्रहार संघटनेच्या आंदोलनाला पाठींबा दिला आहे.

### नेमकं काय म्हणाले मनोज जरांगे?

बच्चू भाऊ तुमची मागणी मान्य नाही केली तर आम्ही रस्त्यावर उतरू, सरकारला सळो की पळो करुन सोडू. बच्चू कडू यांच्या मागण्याची मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी दखल घ्यावी. राज्यातील सर्व शेतकऱ्यांनी जात-पात न पाहता रस्त्यावर उतरायला हवं. कारण जीवाची बाजी लावणं सोपं नाही, असे मनोज जरांगे यांनी म्हटले आहे.

### बावनकुळेंची भाषा दादागिरीची- बच्चू कडू

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची फोनवरील भाषा ही दादागिरीची असल्याचा दावा त्यांनी केला. त्यांना सत्तेची मस्ती असल्याचे बच्चू कडू म्हणाले.

# चोरीस गेलेले साडे दहा लाखाचे सोने ४८ तासात मिळवले

### महिला अटक; बीड शहर पोलिसांनी लावला गुन्ह्याचा छडा



**बीड । प्रतिनिधी**

येथील डॉ. लक्ष्मीकांत आंधळे यांच्या घरातून साडे दहा लाख किमतीचे ११ तोळे सोने दि. ८ जून रोजी चोरीस गेले होते. या गुन्ह्याचा तपास लावण्याचे आव्हान स्विकारुन बीड शहर पोलिसांनी पोलिस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली अवघ्या ४८ तासात गुन्ह्याचा छडा लावत सर्व सोने परत मिळवले. या प्रकरणी एका महिलेला अटक करण्यात आली आहे.

डॉ. आंधळे यांच्या ◀◀ पान २ वर

# पालिका निवडणुका एकत्र लढणार की स्वतंत्र?

## मंत्री चंद्रशेखर बावनकुळेंनी भुमिका केली स्पष्ट




**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यात आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडणार आहेत. या निवडणुका एकत्र लढणार की स्वतंत्र याबाबत भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे महत्वाचे विधान केले आहे. याबाबत त्यांनी पक्षाची भुमिका काय असेल हे स्पष्ट केले आहे.**

राज्यात आगामी काळात स्थानिक ◀◀ पान २ वर

### आगामी निवडणुका युतीत लढणार-प्रफुल्ल पटेल



आगामी निवडणुकांमधील युतीबाबत बोलताना राष्ट्रवादीचे नेते प्रफुल्ल पटेल यांनी म्हटले की, ‘स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकत्र लढणार आहोत, शक्य असेल तिथे युती केली जाईल. मात्र शक्य नसेल तिथे आपण आपल्या ताकदीवर लढू, यासाठी कार्यकर्त्यांना आतापासूनच तयारीला लागलं पाहिजे.’ असे ते म्हणाले.

### युतीबाबत फडणवीस काय म्हणाले?



भाजप महायुती म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढणार असल्याच्या बावनकुळेच्या विधानाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुजोरा दिला आहे. फडणवीस म्हणाले की, आमची भूमिका पक्की आहे, महायुती म्हणून आम्ही निवडणुका लढणार आहोत, मात्र एखाद्या ठिकाणी जिथे शक्य नाही तिथे मैत्रीपूर्ण लढत होईल, असे ते म्हणाले.

# कर्कश आवाज करणारे १९ दुचाकीचे सायलेन्सर काढले

## वाहतूक शाखेची कारवाई; २५ फॅन्सी नंबर प्लेट जप्त



**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा वाहतूक शाखेची बीड शहरांमध्ये मोठा आवाज करणारे बुलेट सायलेन्सर व मोटर सायकलला फॅन्सी नंबर प्लेट विरुद्ध विशेष मोहिम राबवून १९ मोठे कर्कस आवाज करणारे सायलेन्सर व २५ फॅन्सी नंबर प्लेट यांच्यावर कारवाई करून जप्त करण्यात आले. ◀◀ पान २ वर

# माहेरच्यांना बोलावून पतीचे केले अपहरण

## हात-पाय मोडले; पत्नीसह चौघांवर गुन्हा दाखल

**बीड । प्रतिनिधी**

**पती- पत्नीचा वाद विकोपाला केला आणि नंतर पत्नीने माहेरच्या मंडळींना बोलावून पतीला बेदम चोपले. त्यामध्ये पतीचा दोन्ही पाय आणि हात मोडले. या प्रकरणी बीड ग्रामीण पोलिसांमध्ये पत्नीसह चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रामहरी मोरे असे पतीचे नाव असून अनुसया काकडे असे पत्नीचे नाव आहे.**

रामहरी मोरे याचा विवाह मागील वर्षी अनुसया काकडे हिच्यासोबत झाला होता. परंतु घरगुती कारणावरून दोघांचे सातत्याने भांडण होत होते. त्यामुळे हे पती-पत्नी विभक्त राहत होते. अशातच रामहरी मोरे आपले सामान घेण्यासाठी पत्नीच्या घरी गेला असता या दोघांचे पुन्हा भांडण झाले. भांडणाचा वाद विकोपाला जात असल्याचे लक्षात येताच रामहरी मोरे यांनी घरातून काढता पाय घेतला आणि ते आपल्या गावी निघाले. मात्र त्याच वेळी पत्नीने तिच्या माहेरच्यांना बोलावून घेतले. तिच्या माहेरच्या मंडळींनी रामहरी मोरेचे रस्त्यावरुन अपहरण केले आणि त्याला बेदम मारहाण केली.

या मारहाणीत रामहरी मोरे याचे दोन्ही पाय आणि उजवा हात मोडला असून त्याच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिसांना या प्रकाराची माहिती मिळताच त्यांनी तातडीने पत्नी ◀◀ पान २ वर

# डॉ.कमलाकर आंधळे यांचे निधन



बीड । प्रतिनिधी

येथील सेवानिवृत्त जिल्हा आरोग्य अधिकारी आणि माजी क्षयरोग अधिकारी डॉ. कमलाकर साहेबराव आंधळे यांचे बुधवार दिनांक ११ जून रोजी दुपारी ४.०० वाजता दुःखद निधन झाले मृत्यूसमयी त्यांचे वय ६७ वर्षे होते. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर पुणे येथील ◀◀ पान २ वर

# नेत्यांच्या मर्जीतले निवृत्त अधिकारी पुन्हा प्रशासनात येणार

## सरकारचा निर्णय; ६५ वर्षांपर्यंत कंत्राटी पद्धतीने सेवेत घेणार

**मुंबई । प्रतिनिधी**

निवृत्त झाल्यानंतर सात वर्षांपर्यंत म्हणजे वयाच्या ६५ वर्षांपर्यंत अशा अधिकाऱ्यांना कंत्राटी पद्धतीने सेवेत काम करण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे नेत्यांच्या मर्जीतले निवृत्त अधिकारी पुन्हा प्रशासकीय सेवेत येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मंत्रालयासह अनेक शासकीय ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.११ जुन २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १७५.५० क्विंटल | २,३३१ | २,८०० | २,५१९ |
| ज्वारी/हायब्रिड: १७०.०० क्विंटल | १,८४० | ३,००० | २,४०४ |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,२०० | २,२०० | २,२०० |
| तूर : ४.०० क्विंटल | ६,००० | ६,२५१ | ६,१२५ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी:१४४.०० क्विंटल | १,९०० | २,६०१ | २,२७१ |
| मुग :१.५० क्विंटल | ६,००० | ६,००० | ६,००० |
| सोयाबीन:२०.०० क्विंटल | ४,२३१ | ४,२३१ | ४,२३१ |
| हरभरा: १२.०० क्विंटल | ५,३४९ | ५,३४९ | ५,३४९ |

# आष्टी तालुक्यात वादळी वाऱ्यासह पावसाचे थैमान

## वाहतुक ठप्प; विद्युत जनित्रासह रस्त्यावर झाडे पडली, तात्काळ पंचनामे करा-तहसिलदार पाटील

**बीड । प्रतिनिधी**

गेल्या तीन चार दिवसाच्या विश्रांतीनंतर आष्टी तालुक्यात वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. या वादळी पावसाने अक्षरश: थैमान घातले असून यावेळी विद्युत जनित्रासह रस्त्यावर अनेक झाडे उन्मळून पडली. अनेक ठिकाणी रस्त्यावर झाडे पडल्याने वाहतुक काही काळ ठप्प झाली होती. वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसाने मोठे नुकसान झाले असून पिकांच्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करण्याचे आदेश तहसिलदार वैशाली पाटील यांनी दिले आहेत.

◀◀ पान २ वर





### पेरणीसाठी दमदार पावसाची गरज

मे महिन्यात चांगला पाऊस झाल्याने यंदा लवकर पेरण्या उरकतील असे सर्वांना वाटत होते. मात्र ११ जूनपर्यंत समाधानकारक पाऊस न झाल्याने खरीप पेरण्या खोळंबल्या आहेत. दमदार पाऊस झाला तरच पेरण्या सुरु करव्यात, असा सल्ला हवामान विभागाने दिला आहे.

cmyk

अग्रलेख

# निवडणुकीतील महाघोटाळा!

लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत मॅचफिक्सिंग झाल्याचा आरोप केला आहे. मॅचफिक्सिंग हा शब्द क्रिकेटने लोकप्रिय केला आहे. क्रिकेटमध्ये सामन्याचा निर्णय निश्चित करण्यासाठी जे घोटाळे करण्यात आले त्याला मॅचफिक्सिंग असे म्हटले जाते. असे करण्यासाठी पैसे घेऊन मुद्दाम नोबॉल टाकणे, वाईड चेंडू टाकणे, झेल सोडणे, असे प्रकार केले गेले. पैशाच्या लोभापोटी असे प्रकार घडले. मॅचफिक्सिंगची वाळवी राजकारणातही शिरली. सत्ताधा–यांनी पुन्हा सत्तेवर येण्यासाठी जे घोटाळे केले त्याचे नाव मॅचफिक्सिंग. महाराष्ट्राच्या निवडणुकीत मॅचफिक्सिंग झाल्याचा आरोप राहुल गांधी यांनी केला. ‘इंडियन एक्स्प्रेस’ दैनिकात लिहिलेल्या लेखात राहुल गांधी यांनी हे आरोप केले आहेत. महाराष्ट्राची निवडणूक ही महाघोटाळ्यांची ब्ल्यू प्रिंट होती, असे राहुल गांधी यांनी म्हटले आहे. या निवडणुकीत फसवणूक, हेराफेरी आणि जनादेशाची पद्धतशीर मांडणी राहुल गांधी यांनी आपल्या लेखात केली असून निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवरच संशय व्यक्त केला आहे.

राहुल गांधी यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे निवडणूक आयोगाने देऊन संभ्रम दूर करणे अपेक्षित असताना भाजपकडून त्याची उत्तरे दिली जात आहेत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक लेख लिहून खुलासा देण्याचा प्रयत्न केला आहे म्हणजे ‘काटा रुते कुणाला, आक्रंदतात कोणी’ असा हा प्रकार! या संदर्भात मुख्यमंत्री फडणवीस खुलासा करतात हे गंभीर असून निवडणुकीत मॅचफिक्सिंग झाले यावर शिक्कामोर्तब करणारे आहे, असे महाराष्ट्राचे काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी म्हटले आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणूक म्हणजे निवडणूक कशी चोरली जाते याची ब्ल्यू प्रिंट होती. त्याचा पहिला टप्पा निवडणूक आयोगाच्या नियुक्तीसाठी पॅनेलमध्ये घोटाळा करणे हा होता. दुस–या टप्प्यात मतदार यादीत बोगस मतदारांचा समावेश करण्यात आला. तिस–या टप्प्यात मतदानाची टक्केवारी वाढवली गेली. चौथ्या टप्प्यात भाजपला जिथे जिंकणे अशक्य होते तिथे बनावट मतदान करून घेण्यात आले तर पाचव्या आणि अखेरच्या टप्प्यात सगळे पुरावे लपवले गेले, असा दावा राहुल गांधी यांनी केला. महाराष्ट्रात भाजप इतका हतबल का झाला होता हे समजणे अवघड नाही. ही हेराफेरी मॅच फिक्सिंगसारखी आहे. फसवणूक करणारा संघ जिंकतो; परंतु संस्थांना नुकसान पोहोचवतो.

निकालावरील जनतेचा विश्वास उडवतो. महाराष्ट्राची मॅचफिक्सिंग आता बिहार निवडणुकीतही होईल आणि नंतरही जिथे जिथे भाजपला पराभवाची भीती वाटेल तिथे होईल, अशी भीती राहुल गांधी यांनी व्यक्त केली आहे. एप्रिलमध्ये राहुल गांधी यांनी निवडणूक आयोग आता निष्पक्ष राहिलेला नाही, अशी टीका अमेरिकेत केली होती. महाराष्ट्राच्या निवडणुकीतील मतदानाच्या आकडेवारीचा हवाला देताना अखेरच्या २ तासांमध्ये लाखोंच्या संख्येने मतदान होणे भौतिकदृष्ट्या अशक्य असल्याचे राहुल गांधी म्हणाले होते. कारण एका मतदाराला मतदान करण्यासाठी सुमारे ३ मिनिटे लागतात त्यामुळे इतक्या कमी वेळात इतकी मते टाकता येत नाहीत. आयोगाचा डेटा पूर्णपणे चुकीचा आहे, असा आरोप राहुल गांधी यांनी केला होता. बनावट मतदार याद्या व बोगस मतदानाद्वारे ही निवडणूक भाजपने जिंकल्याचे राहुल गांधी म्हणाले होते. राहुल गांधी यांच्या आक्षेपांना देवेंद्र फडणवीस यांनीही एक लेख लिहून उत्तर दिले आहे. फडणवीस म्हणतात, २००९ च्या निवडणुकीतही मतदारांची संख्या वाढली होती त्या वेळी काँग्रेस सत्तेत आली होती.

पराभव स्वीकारून आपण कुठे चुकतो आहोत, जनतेशी आपला कनेक्ट कुठे कमी पडतो, त्यासाठी काय केले पाहिजे यावर विचार करा, असा सल्ला फडणवीस यांनी दिला आहे. राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाला प्रश्न विचारले आहेत. त्याची उत्तरे त्यांनी देणे अपेक्षित असताना भाजप नेते उत्तरे देत आहेत. हे प्रयत्न हास्यास्पद असून उपस्थित केलेल्या प्रश्नांना मुद्देसूद उत्तरे देण्याऐवजी टीका करत जनतेला भ्रमित करण्याचा केविलवाणा प्रयत्न आहे, असे प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे. भाजपने राहुल गांधी पराभवामुळे वैफल्यग्रस्त असल्याचे म्हटले आहे; परंतु देशातील एका प्रमुख विरोधी पक्षाच्या नेत्याने केलेल्या आरोपांचे निराकरण करायलाच हवे. ते न केल्यास ज्यांच्या मनात शंका आहे ती कायम राहील. त्यांचे आरोप चुकीचे असतील तर तसे स्पष्ट करण्याचे काम निवडणूक आयोग आणि सत्ताधा–यांनी करायला हवे. कारण लोकशाहीत कोणतेही तथ्यहीन आरोप होऊ नयेत, अशी सर्वांचीच इच्छा असते. निवडणुकीत मतदारांचे प्रमाण कसे वाढले आणि विशिष्ट मतदारसंघात शेवटच्या तासात मतदान वाढवण्याचे प्रयत्न झाले का, याचा उलगडा व्हायला हवा.

कारण काही मतदारसंघात झालेला गोंधळ सा–यांनी पाहिला आहे. लोकशाहीत जे जे प्रश्न उपस्थित केले जातील त्याचे उत्तर देणे सत्ताधा–यांचे कर्तव्य आहे. विरोधक खोटे आरोप करत असतील तर त्याची दखल जनता घेईलच. मतांचे पावित्र्य हा सर्वात संवेदनशील मुद्दा आहे. इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशिनबाबत मतदारांमध्ये नेहमीच कुतूहल आणि विरोधकांमध्ये कायम संशय राहिला आहे. केवळ भारतातच हा संशय व्यक्त केला जातो असे नाही. ३३ देशांमध्ये इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान होते आणि काही देशात मतदान यंत्रांच्या विश्वासार्हतेबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण करण्यात आले होते. तेथेही शंका दूर करण्यावरच भर दिला जात आहे. ईव्हीएमबाबत सर्वसामान्य जनतेच्या मनात कायम शंका आहे म्हणून मतदान प्रक्रियेवरील विश्वास दृढ होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. ईव्हीएम हॅक करणे शक्य आहे का? याचे उत्तर दिले पाहिजे, ते सोदाहरण पटवून दिले पाहिजे तरच शंकेचे मळभ दूर होण्यास मदत होईल. नसता आरोप–प्रत्यारोप होतच राहतील.

## आष्टी तालुक्यात रमेश भोगाडे यांचे विमा प्रतिनिधी व सल्लागार म्हणून उत्कृष्ट कार्य

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

**वयाच्या उत्तरार्धात मनाला हवं असतं फक्त एकच गोष्ट शांतता. आयुष्यभर कष्ट करून, जबाबदाऱ्या पार पाडून, प्रत्येकाने आपल्या कुटुंबासाठी दिलं ते सर्व काही. पण निवृत्तीनंतर स्वतःसाठी जगायचं असत आपल्या इच्छांनी, आपल्या सन्मानानं.**

पण सन्मानाने जगण्यासाठी लागतो आत्मविश्वास आणि त्या आत्मविश्वासासाठी लागतो आर्थिक आधार. अनेक ज्येष्ठ नागरिक आजही केवळ याच गोष्टीची वाट पाहतात मुलांवर भार नको, पण जगण्याची हमी हवी. अशाच प्रत्येक मनासाठी ने सादर केलेली ‘जीवन उत्सव’ योजना म्हणजे आशेचा एक विश्वासार्ह किरण आहे. ही योजना सांगते तुमचं आयुष्य संपलेलं नाही, तर सन्मानाने जगण्याची एक नवी संधी सुरू होते. वयाच्या ५० व्या वर्षी ही योजना सुरू केली, तर पुढील १० वर्षे म्हणजे ६० व्या वर्षापर्यंत दरवर्षी १ लाख प्रीमियम भरायचा असतो. त्यानंतर तीन वर्षांचा गॅप पीरियड असतो. आणि नंतर सुरू होते त्या कष्टांची खरी परतफेड ६३ व्या वर्षापासून दरवर्षी १ लाख इतकं हमी उत्पन्न, तेही मृत्यूपर्यंत. हा परतावा म्हणजे एक रक्कम नाही, ती आहे आत्मसन्मानाची ओळख. ही योजना सांगते आता जगायचं स्वतःसाठी, स्वतःच्या निर्णयावर, स्वतःच्या पायावर. ‘जीवन उत्सव’ फक्त योजना नाही, ती आहे एक वचन ‘तुमचा सन्मान आम्ही जपू’. या योजनेत विमा संरक्षणही आहे. म्हणजेच, योजनेच्या कालावधीत काही अनपेक्षित घडलं, तरी तुमच्या कुटुंबाला आर्थिक आधार मिळतो.

# मुदतबाह्य खानपट्टा यांची तपासणी करण्याचे महसूल मंत्र्याचे निर्देश

## बीड जिल्हाधिकारी जॉन्सन यांच्या कामाची पद्धत पाहता कारवाई होईल का यावर संशय–अजय सरवदे

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यामध्ये मुदत संपुष्टात आलेल्या १२ स्टोन क्रेशर व ५३ खानपट्टाधारकांची माहिती विज बिल न भरल्याने याबाबतीत शासनास व मंत्री महोदयांना तक्रार सादर केली होती. तक्रारीच्या अनुषंगाने नियमानुसार मंजूर व नूतनीकरण केलेल्या काही खाणपट्टाधारकांकडून खानपट्टा आदेशातील, करारनाम्यातील व पर्यावरण अनुमतीमधील अटी व शर्तीचा भंग होत असल्याबाबत शासनाकडे वारंवार तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, त्या अनुषंगाने महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियमामधील नियम ८० नुसार राज्यातील गौण खनिजांच्या** खाणपट्ट्यांची मोहीम स्वरूपात तपासणी करणे आवश्यक आहे असे पत्र काढले आहे.



बीड जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांनी अनधिकृत व मुदत संपुष्टात आलेल्या खानपट्टा व स्टोन क्रेशर धारक यांच्यावर तात्काळ नियमानुसार दंडात्मक कारवाई करून संबंधित खानपट्टा व स्टोन क्रेशर सील करून दोन दिवसात अहवाल सादर करण्याचे निर्देश तत्कालीन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ यांनी दिली होते. तसेच अनाधिकृत व मुदतबाह्य खानपट्टा बस स्टोन क्रेशर यांचा विद्युत पुरवठा बंद करण्यासाठी अधीक्षक अभियंता महावितरण मंडळ कार्यालय बीड यांनाही पत्र व्यवहार केला होता. सदर प्रकरणी तत्कालीन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवत संबंधित मुदतबाह्य खानपट्टा व स्टोन क्रेशर धारकांकडून आर्थिक व्यवहार करत कारवाई केली नाही. सदर प्रकरणी जिल्हाधिकारी बीड यांच्या आदेशाला महत्व न देणाऱ्या उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याची मागणी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी केली होती.

> “ ७ दिवसाच्या आत परिपूर्ण माहिती शासनास सादर करण्याचे आदेश
>
> जिल्ह्यातील खाणपट्ट्याची तपासणी करण्यात यावी आणि तपासणीत खाणपट्टाधारक यांनी अटी व शर्तीचा भंग केल्याचे निदर्शनास आल्यास प्रचलित कायद्यातील व नियमावलीतील तसेच करारनाम्यातील व पर्यावरण अनुमतीमधील तरतुदीनुसार आपण कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची संपूर्ण माहिती ७ दिवसात शासनास सादर करावी. शासनाने कितीही खानपट्टा तपासणीसाठी नमुने/अर्ज पाठवले तरी बीड जिल्ह्यातील अधिकारीकर्मचारी यांच्यात दडलेले नमुने यामधून आर्थिक व्यवहार करत कारवाई तर करणारच नाहीत पण खोटी माहिती शासनास सादर करतील.

# पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या नियोजन बैठकीच्या अगोदरच प्रशासकीय मान्यतेचे बनावट आदेशाचे प्रत आढळली

**जालना । प्रतिनिधी**

**शनिवारी दिनांक १४ जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये नियोजन समितीची बैठक जालन्याचे पालकमंत्री पंकजा मुंडे यांची नियोजन समितीची बैठक होणार आहेत. या अगोदरच**

जालना जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागांतर्गत ग्रामीण भागात दलीत वस्त्यांमध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध विकास कामांच्या प्रशासकीय मान्यतेचे बनावट आदेश उघडकीस आल्याने जिल्हा परिषदेच्या अधिकारी व कर्मचारी वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.विशेष म्हणजे या प्रशासकीय मान्यतेच्या आदेशावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे यांच्या बनावट स्वाक्षऱ्या करून सदर आदेश बाह्यास्त अज्ञात व्यक्तीने परस्पर तयार करून ते सरपंच किंवा कंत्राटदारांना दिल्याचे प्राथमिक तपासणीत आढळून आले असून जवळपास १० ते १२ गावातील विकास कामांच्या प्रशासकीय मान्यतेचे बनावट आदेश उघडकीस आल्याचे माहिती समोर आली याप्रकरणी जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी यांनी तात्काळकर परिषद घेऊन




माझी सही नसल्याचे खुलासा केला आहे. याप्रकरणी नियमाप्रमाणे चौकशी करण्यात येणार आहे तसेच पोलीस स्टेशनमध्ये फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. अशी पण माहिती देण्यात आली आहे. यावेळी बोलताना ते म्हणाले की समाज कल्याणअधिकारी आनंद कदम यांची स्वाक्षरी व तसेच माजी स्वाक्षरी सारखीच असल्याचे सांगण्यात आले यामुळे याप्रकरणी चौकशी करण्यात येणार आहे अशी माहिती पत्रकार परिषद मध्ये देण्यातआली . तालुक्यासह जिल्ह्यातील अन्य तालुक्यात असे प्रकार घडले असण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्या अनुषंगाने जिल्हा परिषद प्रशासनाने उच्चस्तरीय चौकशी करण्याची आवश्यकता आहे.या चौकशीतून प्रशासकीय मान्यतेचे बनावट आदेश तयार करणारे मास्टर माईंड कोण आहे हे देखील स्पष्ट होईल. याप्रकरणी रामनगर येथील एका सरपंचाकडे प्रशासकीय मान्यता ची ऑर्डर प्राप्त झाल्यामुळे एकच खळबळ उडाली यामुळे संबंधित सरपंचाकडे सदरील प्रशासकीय मान्यता ची ऑर्डर कोणाकडून आली याचे पण चौकशी होणे गरजेचे आहे. अनु जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्त्यांचा विकास करणे या योजनेच्या सन २०२४–२५ या वर्षाच्या बनावट प्रशासकीय मान्यता निर्गमीत बाबत दि.०९.०६.२०२५ रोजी काही अभ्यागतांनी व नवबौद्ध घटकांच्या वस्त्यांचा विकास करणे या योजनेच्या सन २०२४–२५ या आर्थिक वर्षाच्या अंदाने ०१ कोटी मान्यताची सिग्नेचर बनावट प्रशासकीय मान्यता तयार करून त्याच्या आधारावर कामे करून घेऊन त्याची देयके सादर केली असल्याचे पुराव्यामा निदर्शनास आल्याचे समजते. सदरील प्रशासकीय मान्यतांची मुळ संधीवरून पडणी केली असता एकवीत प्रशासकीय मान्यता आदेशामध्ये पात नमूद कामांची नावे आढळून आलेली नाहीत प्रशासकीय मान्यतेवरील स्वाक्षरी अति मुकाअ यांचे स्वाक्षरीशी जुळत नाही म्हणजेच शासकीय कथा अप करणेच्या हेतूने अशा प्रकारचे बनावट आदेश तयार करण्यात आलेले आहेत. या प्रकरणी सर्व गटविकास अधिकाऱ्यांना पत्र पाठवण्यात आली आहे. अशी माहिती पत्रकार परिषद मध्ये जिल्हा परिषदचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे यांनी माहिती दिली.मूळ एकत्रीत प्रशासकीय मान्यता आदेशांच्या शिवाय स्वतंत्र बनावट प्रम्रांच्या आधारे कामे पूर्ण केल्याचे भासवून देयके सादर केली असल्यास अश्या सर्व कामांची देयके अदा होणार नाहीत याची दक्षता घेण्यात येत आहे आणि बनावट प्रमांच्य आधारे शासनाची फसवणूक कराणायांवर गुन्हे दाखल करण्यात येणार आहे. यामध्ये कोणीही असेल तर त्याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात येणार आहे कार्यालयातील कर्मचाऱ्यांचा सहभाग असल्यावर त्यांचेविरुद्धही सुद्धा तातडीने कारवाई करण्यात येईल अशी माहिती शिरीष बनसोडे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिली आहे.

# सराईत गुन्हेगाराकडून चोरीच्या१५ मोटरसायकल जप्त

**जालना । प्रतिनिधी**

**सात पोलीस स्टेशन अंतर्गत चोरी केलेल्या मोटार सायकल चोरी करणारा सराईत गुन्हेगाराकडुन १५ मोटरसायकल ३,६७,०००/– रुपये किमंती वेगवेगळ्या कंपनीच्या १५ मोटार सायकली जप्त करण्यात आल्या सदरील कारवाई पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाई केली.**

जालना जिल्ह्यातील मोटार सायकल चोरी चे गुन्हे उघडकीस आणणे बाबत मा. श्री. अजय कुमार बंसल, पोलीस अधीक्षक ,.श्री. आयुष नोपाणी, अपर पोलीस अधीक्षक यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव व पथकास सुचना दिल्या होत्या, त्यावरुन पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव स्थागुशा जालना यांचे मार्गदर्शनाखाली स्थागुशाचे पथक तयार करुन कारवाई करण्या बाबत मार्गदर्शन केले होते. त्या अनुषंगाने दिनांक १०/०६/२०२५ रोजी स्थागुशा येथील पथक मोटार सायकल चोरी करणारे गुन्हेगारां बाबत माहिती घेत असतांना त्यांना गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषण आधारे माहिती मिळाली की, रेकॉर्ड वरील आरोपी कृष्णा जालिंदर सोमवारे रा. धनगरगल्ली ता.घनसावंगी हा बऱ्याच वर्षापासून मोटार सायकल चोरी करीत असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली. तसेच याप्रकरणी घनसावंगी पोलीस ठाण्यात मोटरसायकल चोरी प्रकरणी गुन्हा दाखल असल्याचे बोलल्या जात आहे. त्यावरुन सदर पथकाने कृष्णा जालिंदर सोमवारे याचा शोध घेऊन त्यास दिनांक १०/०६/२०२५ रोजी घनसावंगी येथून ताब्यात घेतले. त्यास गुन्ह्याच्या अनुषंगाने विचारपुस करता त्याने जालना शहरातून विविध भागातुन मंठा येथील आठवडा बाजार, मंठा गावातुन, अंबड आठवडी बाजार, मत्सोदरी मंदीर परिसर, घाटी दवाखाना व एम.आय.डी. परिसर छत्रपती संभाजीनगर, नाथ मंदीर पेठण अशा ठिकाणाहून मोटार सायकल चोरी केल्याचे सांगितले आहे. सदर आरोपी कडुन खालील प्रमाणे जालना जिल्हा व छत्रपती संभाजीनगर शहर व ग्रामिण येथे दाखल असलेले मोटार सायकल घे गुन्हे उघडकीस आणले आहे. ठाणे कदिम जालना यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदर ची कारवाई ही मा.श्री. अजय कुमार बंसल पोलीस अधीक्षक ,आयुष नोपाणी अपर पोलीस अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली श्री. पंकज जाधव, पोलीस निरीक्षक स्थागुशा , योगेश उबाळे, सहा. पो. निरी, राजेंद्र बाघ, पोउपनि, / रामप्रसाद पव्हरे, पोहवा प्रभाकर वाघ, लक्ष्मीकांत आडेप, गोपाल गोशिक, प्रशांत लोखंडे, संदिप चिचोले जगदीश बावणे, कैलास खार्ड, विजय डिक्कर, रुस्तुम जैवाळ, सागर बाविस्कर, संभाजी तनपुरे, देविदास भोजने, सतिषस श्रीवास, आक्कुर धांडगे, कैलास चेके, धिरज भोसले, भागवत खरात, योगेश सहाने, सोपान क्षीरसागर, रमेश काळे, किशोर पुंगळे सर्व स्थानिक गुन्हे यांनी कारवाई केली.

## पान १ वरून...

### पालिका निवडणुका एकत्र

स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडणार आहेत. यासाठी प्रशासनासह सर्वच राजकीय पक्ष तयारी करत आहेत. या निवडणुका स्थानिक स्तरावर होत असल्याने याकडे सर्वांचेच लक्ष लागलेले आहे. आता या निवडणुका एकत्र लढणार की स्वतंत्र याबाबत भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे महत्वाचे विधान केले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील युतीबाबत बोलताना चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले की, ‘राज्यातील सर्व निवडणुका आम्ही एकत्र महायुती म्हणून लढणार आहोत. याबाबतचे आदेश आम्ही पक्षातील नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना दिले आहेत. आमचे स्थानिक पातळीवरील कार्यकर्ते एकमेकांची याबाबत चर्चा करत आहेत. मात्र जर एखाद्या ठिकाणी एखाद्या जागेवरून वाद निर्माण झाला तर त्या ठिकाणी मैत्रीपूर्ण लढत होईल. मात्र इतर ठिकाणी युतीत निवडणुका लढल्या जातील, त्यामुळे संभ्रम बाळगण्याची गरज नाही, असे ते म्हणाले.

---------

### चोरीस गेलेले साडे दहा लाखाचे

घरात कोणी नसल्याचा फायदा घेत अज्ञात चोराने साडे दहा लाखाचे सोन्याचे दागिने चोरले. या प्रकरणी शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा छडा लावण्याचे आव्हान शहर पोलिसांनी स्विकारत सीसीटीव्हीच्या मदतीने त्या भागामध्ये कोणाचा वावर होता याचा बारकाईने अभ्यास केला गेला. त्यावरून एका महिलेला अटक करण्यात आली. तिच्याकडे सखोल विचारपुस करून तिच्या कबूलीअंती गुन्ह्यात चोरी गेलेला संपूर्ण ऐवज आरोपी महीलेकडून जप्त करण्यात आला आहे. आरोपीचे नाव लक्ष्मी प्रमोद वडमारे (रा. पंचशील नगर, बीड) असे आहे. दोनच दिवसात पोलिसांनी चोरीस गेलेल्या मुद्देमाल परत मिळवल्यामुळे फिर्यादीने समाधान व्यक्त केले आहे. पोलीस अधीक्षक नवनीत काँवत आणि अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर यांनी घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी सर्व पोलीस ठाणे प्रभारी यांना सूचना दिलेल्या आहेत. त्यांच्या मार्गदर्शनानुसार बीड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ, सहाय्यक पोलीस निरीक्षक बाबा राठोड, पोलीस अंमलदार संजय राठोड, मनोज परजणे, गहिनीनाथ बावनकर राम पवार यांनी अथक परिश्रम करून नमूद गुन्हा उघडकीस आणला आहे.

-------------

### माहेरच्यांना बोलावून पतीचे

आणि तिच्या माहेरच्या मंडळींवर गुन्हा दाखल केला आहे.

---------

### कर्कश आवाज करणारे १९

ही कारवाई दि. ११ जून रोजी करण्यात आली.

बुलेटला कर्कश आवाज करणारे सायलेन्सर आजही मोठ्या प्रमाणात असून याचा वयोवृध्द आणि लहान मुलांना त्रास होतो. त्यामुळे वाहतुक शाखेने दि. ११ जून रोजी कर्कश आवाज करणारे सायलेन्सर आणि फॅन्सी नंबर प्लेट काढण्याची मोहीम हाती. घेतली. यावेळी १९ कर्कश आवाज करणारे सायलेन्सर आणि २५ फॅन्सी नंबर प्लेट जप्त करण्यात आले. सदर कारवाई बीड शहर वाहतूक पोलिसांच्या वतीने करण्यात आली. बीड पोलीस अधीक्षक नवनीत काँवत व अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांचे मार्गदर्शनाखाली वाहतूक शाखा प्रभारी अधिकारी सपोनी सुभाष सानप, पीएसआय विजय जाधवर, एचसी घोलप, पीसी शेख, घुले, एचसी हरके यांनी केली आहे.

----------

### नेत्यांच्या मर्जीतले निवृत्त

ठिकाणी कंत्राटी भरतीला प्राधान्य देणाऱ्या राज्य सरकारने आणखी एक मोठा निर्णय घेतला आहे. आता सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनाही कंत्राटी पद्धतीने पुन्हा सेवेत घेता येणार आहे. वयाच्या ६५ व्या वर्षांपर्यंत या अधिकाऱ्यांना कंत्राटी पद्धतीने काम करता येणार आहे. राज्य शासनाच्या या निर्णयाला कर्मचारी आणि अधिकारी संघटनांनी मात्र विरोध केला आहे. अशा अधिकाऱ्यांची निवड करताना मर्जीतल्या अधिकाऱ्यांनाच संधी दिली जाईल, भेदभाव होण्याची शक्यता असल्याचा आरोप संघटनांनी केला आहे. राज्यातील बहुतांश खात्यातील जागा कायमस्वरुपी न भरता त्या कंत्राटी पद्धतीने भरण्याला राज्य सरकारने प्राधान्य दिले आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी नव्याने भरतीच झाली नसल्याचे दिसून येत आहे. त्यातच आता राज्य सरकारने आणखी निर्णय घेतला आहे. शासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या सरकारी अधिकाऱ्यांना पुन्हा कंत्राटी पद्धतीने सेवेत घ्यायचा मार्ग मोकळा झाला आहे. वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंत अशा अधिकाऱ्यांना कंत्राटी भरतीच्या माध्यमातून सेवेत घेण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यामध्ये सर्व शासकीय आणि निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना करार पद्धतीने सेवेत घेता येणार आहे.

**कर्मचारी, अधिकारी संघटनेचा विरोध**

सध्या राज्यात शासकीय निवृत्तीचे वय ५८ वर्षे आहे. त्यामुळे करार पद्धतीने अशा अधिकाऱ्यांना आणखी सात वर्षे सेवेत राहता येणार आहे. मात्र राज्य सरकारच्या या निर्णयाला कर्मचारी, अधिकारी संघटनांचा विरोध आहे. जर राज्य सरकार ६५ वर्षापर्यंत करार पद्धतीने कामावरती घेत असेल तर निवृत्तीचे वय ६० वर्षे का करत नाही असा प्रश्न त्यांनी विचारला आहे.

---------

### डॉ.कमलाकर आंधळे

खाजगी रुग्णालयात उपचार सुरू होते. बीड तालुक्यातील हिंगणी येथील मुळचे रहिवासी असलेले डॉ. कमलाकर आंधळे यांचे कुटुंबीय हे वारकरी संप्रदाय आणि संत भगवान बाबा यांच्या संपर्कात असणारे श्रद्धावान कुटूंब. १९८५ साली वैद्यकीय पदवी मिळाल्यानंतर ते शासकीय सेवेत रुजू झाले. वैद्यकीय सेवा करत असतानाच त्यांना १९९५ साली दुर्धर आजाराने ग्रासले. गेल्या ३० वर्षापासून त्यांनी आजाराशी सामना केला. मृत्यूसोबत चालू असलेला संघर्ष आज संपला. श्रीक्षेत्र भगवानगडाचे निस्सीम भक्त आणि सेवेकरी असलेले अजातशत्रु अधिकारी म्हणून डॉ. आंधळे यांची ओळख होती. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, भाऊ, पुतणे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या मृतदेहावर गुरुवार दि. १२ जुन रोजी अंकुशनगर, स्मशानभूमी बीड येथे सकाळी १०.०० अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. स्व. डॉ.कमलाकर आंधळे हे डॉ. सुधाकर आंधळे यांचे बंधु होत.

-------------

### आष्टी तालुक्यात वादळी

यंदा मे महिन्यात मान्सूनपुर्व पाऊस चांगला झाल्याने यावर्षी लवकर पेरणी होईल असे वाटत असताना जूनच्या सुरुवातीलाच पावसाने दडी मारली. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतातील मशागतीची कामे करता आली. आठवडाभराच्या विश्रांतीनंतर आष्टी तालुक्यात पावसाने जोरदार हजेरी लावली. दुपारनंतर सुरु झालेल्या या पावसाने मोठे नुकसान केले. विजेच्या कडकडाटासह आणि वादळी वाऱ्यासह झालेल्या या जोराच्या पावसामुळे रस्त्यावर झाडे उन्मळून पडली. तर आष्टीत एका विद्युत जनित्रावर झाड कोसळले असल्याने बराच काळ विज पुरवठा खंडीत झाला होता. तसेच एका दुचाकीवर झाड पडल्याने मोठे नुकसान झाले असून दुचाकीस्वार जखमी झाला आहे. रस्त्यावर पडलेल्या झाडांमुळे वाहतुक ठप्प झाल्याने बराच वेळ गोंधळ निर्माण झाला होता. जेसीबीच्या सहाय्याने रस्त्यावरील झाडे बाजूला करण्यात आली. त्यानंतर वाहतूक सुरळीत झाली. बीड तालुक्यातही दुपारनंतर मोठा पाऊस झाला. या पावसामुळे शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. बीड तालुक्यातही बुधवारी दुपारनंतर जोरदार पाऊस झाला असून सर्वत्र पाणीच पाणी दिसत होते.

-----------

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार दि. १२ जून २०२५
३

## बी.एस.सी. नर्सिंगच्या विद्यार्थ्यांना अभाविपच्या प्रयत्नाने विद्यावेतन लागू

**संभाजीनगर । प्रतिनिधी**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले असून बी.एस.सी. नर्सिंगच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या अंतरवासी (इंटर्नशिप) कालावधीदरम्यान विद्यावेतन मंजूर करण्यात आले आहे. हा निर्णय राज्यातील हजारो नर्सिंग विद्यार्थ्यांसाठी अत्यंत दिलासादायक ठरणार आहे.शासकीय बी.एस.सी. नर्सिंग अभ्यासक्रमांतर्गत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या इंटर्नशिप दरम्यान सकाळ, दुपार व रात्र अशा तीनही सत्रांमध्ये सेवा बजवावी लागते. आपत्कालीन परिस्थितीतही हे विद्यार्थी रुग्णसेवेचे कर्तव्य पार पाडतात परंतु या कालावधीत त्यांना कोणतेही मानधन किंवा विद्यावेतन मिळत नव्हते. या अन्यायकारक परिस्थितीच्या विरोधात अभाविपने आवाज उठवत प्रशासनाला अनेक वेळा निवेदन सादर करून बी.एस.सी. नर्सिंग विद्यार्थ्यांना दरमहा सात हजार रुपये विद्यावेतन देण्याची मागणी केली होती. राज्यातील गोरगरीब व शेतकरी कुटुंबांतील विद्यार्थी या कोर्समध्ये प्रवेश घेत असतात यामुळे विद्यार्थांना दिलासा मिळणार आहे.

शासनाने या निवेदनाची दखल घेत विद्यार्थ्यांच्या हिताचा निर्णय घेतला असून अभाविपच्या या लढ्याला मोठे यश मिळाले आहे. अभाविप या निर्णयाचे स्वागत करत असून या निर्णयामुळे विद्यार्थ्यांच्या अनेक समस्यांचे निराकरण होणार असून त्यांचे मनोबल उंचावन्यास मदत होईल तसेच त्यांच्या शिक्षणाच्या वाटचालीत सकारात्मक बदल घडून येईल.अभाविप देवगिरी प्रदेश मंत्री कु.वैभवी ढिवरे म्हणाल्या की मागील अनेक दिवसांपासून बी.एस.सी. नर्सिंगच्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन लागू व्हावे यासाठी अभाविप प्रयत्न करत होती. या प्रयत्नांना यश आले असून बी.एस.सी. नर्सिंगच्या विद्यार्थ्यांना या निर्णयामुळे दिलासा मिळणार आहे. अश्या अनेक समस्या विद्यार्थ्यांना येतात व त्या सोडवण्यासाठी अभाविप नेहमीच विद्यार्थ्यांसोबत असेल.

# मुले आई-वडिलांची नक्कल करतात म्हणून माऊली दादा सारखे संस्कार करा - प्रदीप मिश्राजी

## माऊली दादासारखे संत कलियुगात पुन्हा होणे नाही- ह.भ.प.रामराव ढोक महाराज

**चाकरवाडी । प्रतिनिधी**

**विसाव्या शतकातील महान सद्गुरू संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पंचेविसाव्या पुण्यस्मरणार्थ आज ह.भ.प. रामराव ढोक महाराज यांचे गुलालाचे कीर्तन झाले रामराव महाराज ढोक यांनी माऊली दादाच्या आठवणींना उजळा देत माऊली दादाची कीर्ती चंद्र सूर्य असे पर्यंत अजरामर झाली आहे माऊली दादाचा वारसा तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य श्री महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर हे अतिशय समर्पक भावनेतून पुढे नेत आहेत. माऊली दादा सारखे संत या घोर कलियुगात पुन्हा होणे नाही असे ह.भ.प. रामराव ढोक महाराज यांनी कीर्तनात प्रतिपादन केले .**





शिवमहापुराण कथेत प.पूज्य. प्रदीप मिश्राजी यांनी शिवमहापुराण कथेत सांगितले की ''घरातील वातावरण अध्यात्मिक आणि सुसंस्कृत असले पाहिजे टीव्ही मोबाईल पाहण्यापेक्षा आध्यात्मिक व संस्कार निर्माण करणारी पुस्तके आई वडिलांनी वाचावीत, यामुळे मुलांवर चांगले संस्कार होतील. मुले आई-वडिलांचे नक्कल करत असतात असे मार्गदर्शन प्रदीप जी मिश्रा यांनी केले. श्री क्षेत्र चाकरवाडी येथे विसाव्या शतकातील महान संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या कृपाशीर्वादाने व तपो निधी शांती ब्रह्मा गुरुवर्य महादेव महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व शिवपुराण कथेत परमपूज्य प्रदीप जी मिश्रा बोलत होते. यावेळी पुढे बोलताना प्रदीप जी मिश्रा यांनी मोलाचे मार्गदर्शन केले शिवपुराण कथेचे महत्व विशद करत असतानाच सध्याच्या परिस्थितीवर ही त्यांनी भाष्य केले शरीर व मनाची भूक भागवण्यासाठी अध्यात्माची अत्यंत गरज आहे. शरीर हे कष्टरहीत असावे तर मनाची भूक भागविण्यासाठी अध्यात्माची गरज आहे मन हे भक्तीत आणि शरीर हे कष्टात समाविष्ट करणे गरजेचे आहे. संत ज्ञानेश्वर माऊली दादा हे आध्यात्मिक होते शिवशंकरावर त्यांचे अपार श्रद्धा होती मोठी भक्ती होती श्रद्धा होती त्यांच्या आचरणाचे सर्व संस्कार महादेव महाराज या मुलांमध्ये उतरले मुले ही आई-वडिलांचे नक्कल करत असतात त्यामुळे आई-वडिलांचे वर्तन हे सुसंस्कृत व अध्यात्मिक असायला हवे. पुढे मुले ही याच वृत्तीचे अनुकरण करत असतात.आई वडीलांनी घरात टीव्ही मोबाईल पहात बसण्यापेक्षा आध्यात्मिक व सुसंस्कृत पुस्तके वाचवित. याचा परिणाम मुलांवर होत असून मुलेही चांगल्या विचारांची निर्माण होतील. पत्नी, मुले यांना वेळ द्या, परिवारासाठी परिवारासाठी वेळ देण्याची तयारी ठेवा पती-पत्नीने त्यागी वृत्ती अंगीकारली तर कुटुंबात कलह निर्माण होऊ शकत नाही. भोलेनाथ भक्ती केल्यानंतर कोणालाही नाराज करत नाहीत त्यामुळे शिवशंकरावर श्रद्धा ठेवून ती करा जीवनात नक्कीच दुःख संपवून आनंद निर्माण होईल असे मुलाचे विचार याप्रसंगी प्रदीप जी मिश्रा.

### पावसाची हजेरी

चाकरवाडी येथे सुरू असलेल्या शिवपुराणकथेस आज भाविकांनी गर्दीचा उच्चांक निर्माण केला. अशा परिस्थितीत पावसाने जोरदार हजेरी लावली. त्यामुळे भाविकांनी भर पावसात छत्री आणि गोपाटचा आधार घेत शिवपुराण कथा ऐकण्याचे पुण्य पदरात पाडून घेतले.

### मान्यरांची भेट

संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या आशीर्वादाने सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाला भाविकांची प्रचंड गर्दी होत असून मान्यवर लोकही भेटी देत आहेत. बुधवारी गोरख बाबा, माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, माजी मंत्री बदामराव पंडित, नंदकिशोर मुडदा सह आदींनी भेटी देऊन शिवपुराण कथेचा लाभ घेतला.

## दहावी व बारावी विद्यार्थीसह पालकांचा सत्कार

**अंबड । प्रतिनिधी**

**तालुक्यात नुकत्याच जाहीर झालेल्या इयत्ता दहावी आणि बारावी वर्गातील विशेष प्राविण्यासह गुण घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा सत्कार व गुणगौरव सोहळाचे आयोजन युवासेना विभागीय सचिव विनायक चोथे यांच्या वतीने करण्यात आहे आहे.**

हा गुणगौरव सोहळा दिनांक १३ जून २०२५ रोजी शुक्रवार सकाळी १०:०० वाजता अंबड शहरातील स्वामी समर्थ मंदिर हॉल येथे असून यासाठी तालुक्यातील सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांच्या प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांना पालकांसह सत्कार सोहळ्याचे निमंत्रणपत्र पाठवले असल्याचे श्री चोथे यांनी प्रसिद्धी पत्रकात केलेली आहे . तसेच यासाठी नागरिकांनी, शिवसेना-युवासेना पदाधिकारी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आव्हान विनायक शिवाजीराव चोथे यांनी केले आहे.

# पगार थकल्यामुळे जि.प. चे कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयाला कुलूप

जालना । प्रतिनिधी

जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभाग या कार्याला त्यांच्याच कर्मचाऱ्यांनी सकाळी साडेनऊच्या दरम्यान कुलूप लावल्यामुळे कार्यकारी अभियंता व कर्मचाऱ्यांमध्ये एकच खळबळ उघडली याप्रकरणी तक्रारदार सिकंदर पठाण यांना विचारले असता ते म्हणाले की आमच्या पगारी तीन महिने पासून झाली नाही . यामुळे याला जबाबदार कार्यकारी अभियंता व संबंधित कर्मचारी आहे असे यांच्याकडून सांगण्यात आले आहे या संदर्भात कार्यकारी अभियंता यांना विचारले असता ते म्हणाले की आम्ही तक्रारदार यांना पत्र देण्यात आले असून असे सांगण्यात आले परंतु खरी माहिती त्यांच्याकडून देण्यात टाळाटाळ करण्यात आली. सिकंदर पठाण यांनी आठ दिवसांपूर्वी पत्र दिले होते परंतु या पत्राची दखल कार्यकारी अभियंता यांनी दखल ना घेतल्यामुळे हा प्रकार घडला असल्याचे समजते.जालना




अंबड, जालना, परतूर आणि भोकरदन येथील वाहनचालक आणि मैल कामगारांचे वेतन मागील तीन महिन्यांपासून धकले आहे. जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांकडे वेळोवेळी मागणी करुनही वेतन मिळाले नसल्याने वाहनचालकांसह कामगारांनी आत्मदहनाचा इशारा दिला आहे. याप्रकरणी काही बरोबर झाल्यास कार्यकारी अभियंता जबाबदार असेल असे पण समजते.

वाहनचालक सिकंदर पठाण, भानदास गायकवाड शेख नवाथ शेख अब्बास, मैल कामगार शिवाजी बाबर, अशोक झोरे,पांडुरंग दुधाळकर, विनायक आवाळे, सरदार चांद सम्यद आदी कामगारांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, अतिरिक्त कार्यकारी अधिकारी आणि बांधकाम कार्यकारी अभियंता यांना वारंवार निवेदने दिली. मात्र, अद्याप वेतन मिळाले नसल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, वेळेवर वेतन नसल्याने उपासमारीची वेळ आली आहे. पैसे उधार घेतलेल्या लोकांनीही तगादा लावला आहे. बँकेच्या कर्जाचे हप्ते थकल्याने वसुली कर्मचारीही घरी येऊन त्रास देत असल्याचे या कामगारांनी सांगितले आहे.

आम्हाला मागील तीन महिन्यांपासून वेतन मिळाले नाही. येणाऱ्या एक तारखेला आता महिने होतील. वेतन नसल्याने आम्ही कसं जगायचं हे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले पाहिजे. आम्ही संबंधित आस्थापनाला विचारले असता तेथील कर्मचारी टाळाटाळ करत आहेत. त्यासोबतच आमचे लाभांशचे देखील प्रस्ताव वित्त विभागाकडे प्रलंबित आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आम्हाला न्याय द्यावा अन्यया आम्ही येथेच आत्मदहन करू असा शेवटचा इशारा सिकंदर पठाण वाहनचालक यांनी निवेदन द्वारे केला आहे.

# गैरवापर करून ग्रामपंचायतमध्ये लाखो रूपयांचा भ्रष्ट्राचार!

जालना । प्रतिनिधी

परतुर तालुक्यातील मौजे वैजोडा ग्रामपंचायतीत येथे सत्तेचा गैरवापर करून आणि प्रशासनातील अधिकार्यांना हाताशी धरून लाखों रूपयांचा भ्रष्ट्राचार केला असल्याची चर्चा परतूर मतदारसंघात असुन त्यांच्या कार्यकर्त्यांने केलेल्या भ्रष्ट्राचाराची चौकशी करण्याच्या मागणी साठी (दि.११ जुन) पासुन गटविकास अधिकारी कार्यालया समोर सामाजीक कार्यकर्ते अशोक साबळे आणि सुरेश कवडे यांनी आमरण उपोषण सुरू केल्यामुळे आ.लोणीकरांनी दिव्याखालचा अंधार पहावा अशी चर्चा मतदार संघातील नागरीक दबक्या आवाजात करत आहेत.



याबाबत सविस्तर वृत्त असे की, परतुर तालुक्यातील मौजे वैजोडा येथील धनगर समाजाची स्मशानभुमी तसेच दलित समाजातील स्मशानभुमी या दोन्ही स्मशानभुमीचे मंजुर झशलेले कामे अद्यापही झाले नाही मात्र एमआरजीएस योजनेअंतगत बिले उचलली, मातोश्री पांदन रस्ता गुत्तेदार गिरी यांनी अधिकार्यांना हाताशी धरून थातुर-मातूर काम करून अंत्यत निकृष्ट दर्जाचा रस्ता करून बोगस बिले उचचली, तसेच वैजोडा येथील होळकर नगर (धनगरवस्ती) या ठिकाणी मंजुर झालेला सिमेंट रस्ता अन्य इतर ठिकाणी बोगस काम करू या कामाचे देखील बिले उचचली आहेत, तसेच होळकर नगर (धनगर वस्ती) या भागात मंजुर असलेली पाणी पुरवाठा पाईपलाईनचे बोगस काम करून शासनाच्या मुल्यांकनाच्या आधारे विकासकामे न करता शासनाची दिशाभुल करून बिले उचलुन सरपंच, ग्रामसेवक, इंजिनिअर, गुत्तेदार निगरगट्ट झाले आहेत, त्यामुळे त्यांनी कामांची तात्काळ चौकशी करून दोषी आढळल्यास त्यांच्यावर शासनाची फसवणुक केल्याप्रकरणी गुन्हे दाखल करून सदरील कामे ही पुन्हा पारदर्शकपणे करण्याची उपोषणकर्ते यांनी केले आहे.

# स्वर्गीय झुंबरलालजी खटोड प्रतिष्ठानच्या वतीने दिनांक १६ जून ते १८ जून भव्य कीर्तन महोत्सव

**बीड । प्रतिनिधी**

**शहरामध्ये गेल्या पंचवीस वर्षाची स्वर्गीय झुंबरलालजी खटोड प्रतिष्ठानची कीर्तन परंपरा अविरत चालू आहे येणाऱ्या आषाढी एकादशीनिमित्त १६ जून ते १८ जून या कालावधीमध्ये सकाळी दहा ते सायंकाळी १० वाजेपर्यंत यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड येथे महाराष्ट्रातील सात ख्यातनाम सांप्रदायिक कीर्तनकार आपली कीर्तन सेवा देणार आहे आषाढी एकादशी ची लगबग संपूर्ण महाराष्ट्रभर व महाराष्ट्राच्या बाहेर चालू आहे याचे औचित्य साधून संत ज्ञानेश्वर संत नामदेव महाराज संत तुकाराम महाराज संत एकनाथ महाराज अनेक सांप्रदायिक संतांचे विचार मनुष्य भवासाठी संताचे विचार किती लाख मोलाचे होते अनेक दशकानंतर सुद्धा ते सिद्ध होते हे विचार कायम मनुष्यामध्ये राहावे याकरिता कायम संत विचार मांडण्याचा प्रयत्न प्रतिष्ठान गेले कित्येक वर्षापासून करत आहे.**

या सात कीर्तनामधून या तीन दिवसांमध्ये आपण आषाढी वारीचे संपूर्ण चित्रण उभा करणार आहोत जसे की आपण आळंदी ते पंढरपूर या वारीमध्ये सामील आहोत अस आपल्याला वाटेल असा हा कार्यक्रम आहे . बीड शहरातील सर्व भाविक भक्तांना विनंती आहे की अतिशय दर्जेदार हा सात कीर्तनाच्या महोत्सव करता आपण बीड शहरातील व आजूबाजूच्या परिसरातील सर्व भाविक भक्त आमंत्रित आहात कारण आपल्या बीड शहराला सांप्रदायिक कीर्तनाची खूप मोठी गेल्या पंचवीस वर्षाची खटोड प्रतिष्ठानची परंपरा आहे प्रतिष्ठानच्या वतीने नम्र निवेदन आहे की आपण आपल्या नातेवाईक मित्रसह किर्तन महोत्सव श्रवण करण्याकरिता १६ जून ते १८ जून रोज सकाळी दहा ते सायंकाळी दहा वाजेपर्यंत आपण यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड येथे उपस्थित रहावे प्रवेश किर्तन महोत्सव करिता सर्वांना विनामूल्य आहे. जास्तीत जास्त भाविकांनी कीर्तन महोत्सवाचा लाभ घ्यावा अशी विनंती स्वर्गीय झुंबरलालजी खटोड प्रतिष्ठान बीडच्या वतीने आपणास करण्यात येत आहे.

पान ६ वरून...

### महायुती सरकारच्या

रोको करण्यात येणार आहे. या रस्ता रोको आंदोलनास मोठया संख्येने शेतकरी, लाडक्या बहिणींनी उपस्थित रहावे असे आवाहन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा समन्वयक भाई संजय महाद्वार, जिल्हा संघटक नितीन धांडे, उपजिल्हाप्रमुख राजू महूवाले, हनुमान जगताप आशिष मस्के, सहसंघटक रतन गुजर, युवा सेना जिल्हा संघटक अभिषेक दिवे, महिला आघाडी जिल्हा संघटक मीरा ताई नवले विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे, कामगार आघाडीचे जिल्हा संघटक रवी वाघमारे, अल्पसंख्यांक आघाडीचे संघटक सय्यद नय्युम, शिव वाहतूक सेनेचे मशरू पठाण, सतीश परदेशी, दिलीप पवार, गणेश लोणकर, नवनाथ प्रभाळे, प्रदीप कोटुळे यांनी केले आहे.

### तथाकथित शिष्याकडून

येथे उत्तराधिकारी म्हणून गावकरी व इतरांनी केशव गीते याच्या नावाला संमती दिली मात्र संबंधिताने संस्थांनच्या नियम व अटी अधीन राहून काम केले नाही. तसेच नियम पाळण्याबाबत हमीपत्र लिहून दिले नाही. केशव गीते अशोभनीय आणि उत्तराधिकारी अथवा महाराज या नावाला काळीमा फासण्याचे कृत्य करत आहे. आपणाला वेळोवेळी शिवीगाळ करून मारहाण केली. मस्साजोग सरपंचप्रमाणेच आपले हातपाय तोडून जेसीबीने खड्डा करून पुरीन, अशा प्रकारचे धमकी संबंधितांनी दिली आहे. याप्रकरणी योग्य ती चौकशी करून आपल्याला संरक्षण द्यावे, अशी मागणी मला देतात महाराज मुंडे आणि त्यांच्या भक्तांनी केली आहे.

### शेतकऱ्यांना, कष्टकऱ्यांना

असल्याचे लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे. बच्चूभाऊ कडू यांचा सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर नेहमीच संघर्ष असतो. त्यांचे प्रत्येक आंदोलन हे निस्वार्थ भावनेने केलेले असते, त्यात समर्पण आणि त्याग असतो. आजमित्तीस ते राज्यातील जनतेच्या हितासाठी तीव्र अन्नत्याग आंदोलन करीत आहेत. एवढे दिवस उलटूनही निगरगट्ट राज्य सरकारला जाग येत नाही. अर्थातच हे सरकार जनहिताचे नसून त्यांच्या स्वार्थासाठी काम करणारे सरकार असल्याचे म्हटले आहे. बच्चूभाऊ कडू यांनी केलेल्या सर्व मागण्या न्याय्य आणि रास्त असून त्या जनकल्याणाच्या दृष्टीने केलेल्या आहेत. आमच्या पक्षाचे सर्वेसर्वा देशाचे नेते शरदचंद्र पवार यांनीही भाऊंच्या या आंदोलनाला पाठिंबा दिलेला आहे. बच्चूभाऊ यांच्या प्रकृतीस काही बाधा झाली तर त्याला हे सरकार जबाबदार असेल. तशी वेळ या राज्य सरकारने आमच्यावर आणलीच तर आम्ही रस्त्यावरील संघर्षही करणार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी म्हटले आहे.

पान ६ वरून...

### चळवळ कशी उभी

(छत्रपती संभाजीनगर) यांनी सांगितले की, प्रा.एस.के.जोगदंड यांच्यासारखा विद्यार्थीभिमुख प्राध्यापक आता होणे नाही. समाजासाठी आबांनी मोठा त्याग केला असे प्रा.डॉ.लुलेकर म्हणाले. तर सामाजिक कार्यकर्त्या मंगलताई खिंवसरा (छत्रपती संभाजीनगर) यांनी आबांच्या यशस्वी वाटचालीत त्यांच्या सुविद्य पत्नी सुधाताई यांचे ही मोठे योगदान आहे असा त्यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला. यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने समितीचे माजी सदस्य प्रा.पी.जी.जोगदंड (मुंबई) यांनी आपल्या भाषणात आबांचे कार्य, त्याग, समर्पण आणि जीवनमूल्ये जपत केलेला संघर्षमय प्रवास उलगडला. आबांनी अनेक विद्यार्थी घडवले. जे आज मोठ-मोठ्या पदांवर कार्यरत आहेत. चळवळ पुढे नेण्यासाठी समाजात आता दुसरे आबा तयार झाले पाहिजेत अशी अपेक्षा प्रा.जोगदंड यांनी व्यक्त केली. यावेळी आबांच्या सुविद्य पत्नी सुधाताई जोगदंड, पत्रकार सुरेश पाटील (छत्रपती संभाजीनगर) तसेच प्रा.एस.के.जोगदंड यांनीही आपले समायोचित मनोगत व्यक्त केले. यावेळी बोलताना ज्येष्ठ विचारवंत ज.वि.पवार यांनी चळवळ कशी उभी राहते, परिवर्तनाची लढाई कशी लढली जाते आणि चळवळीचे फलित कसे मिळवले जाते. हे जाणून घेण्यासाठी नव्या पिढीतील कार्यकर्त्यांनी सम्यक पांथस्थ आबा हा ग्रंथ जरूर वाचावा, अभ्यासावा असे आवाहन पवार यांनी उपस्थितांना केले. अध्यक्षीय समारोप करताना डॉ.सुरेश खुरसाळे म्हणाले की, प्रा.एस.के.जोगदंड यांच्या सारख्या प्राध्यापक, कार्यकर्त्याची गरज काल ही होती. पण, कालच्या पेक्षा आज जास्त आहे. एकिकडे प्राध्यापक म्हणून काम करताना प्रा.जोगदंड सरांनी विद्यार्थ्यांना शिकवत त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक ही केली. तसेच दुसरीकडे एक कार्यकर्ता म्हणून त्यांनी चळवळ ही उभी केली. त्यामुळे विद्यार्थी, कार्यकर्ते आणि युवकांसाठी सम्यक पांथस्थ आबा हा गौरवग्रंथ प्रेरक आणि दिशादर्शक ठरेल असा विश्वास डॉ.खुरसाळे यांनी व्यक्त केला. प्रारंभी मान्यवरांनी तथागत गौतम बुद्ध आणि महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. आयोजकांनी मान्यवरांचे स्वागत केले. बोधिघाट महिला मंडळाने अतिथी हा जयभीम घ्यावा हे स्वागतपर गीत सादर केले. वंचित बहुजन आघाडीकडून ज्येष्ठ विचारवंत ज.वी.पवार यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.वाल्मिक सरवदे (प्र.कुलगुरू, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर) यांनी केले. तर सुत्रसंचालन माजी मुख्याध्यापक लंकेश वेडे यांनी करून उपस्थितांचे आभार सुखदेव भुंबे यांनी मानले. प्रा.एस.के.जोगदंड यांच्या जीवनचरित्रावरील सम्यक पांथस्थ आबा या गौरवग्रंथाचे संपादन ज्येष्ठ पत्रकार तथा माध्यम तज्ज्ञ प्रा.जयदेव डोळे, मंगलताई खिंवसरा, ज्येष्ठ संपादक प्रा.नानासाहेब गाठाळ, माजी मुख्याध्यापक लंकेश वेडे, मुक्त पत्रकार अमर हबीब, डॉ.वाल्मिक सरवदे, सुरेश पाटील, राम दोतोंडे यांनी केले आहे. तर गौरवग्रंथ समिती मध्ये ज.वि.पवार, शांताराम पंदेरे, डॉ.सुरेश खुरसाळे, डॉ.साहेबराव गाठाळ, अण्णा खंदारे, अशोक देशमुख, चंद्रशेखर बर्दापूरकर, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलसचिव प्राचार्य डी.ए.चव्हाण, सुखदेव भुंबे, उपप्राचार्य गौतम गायकवाड, डॉ.नरेंद्र काळे, प्रा.अरूंधती पाटील, प्रा.माणिक कांबळे, रमेशभाई खंडागळे, रामभाऊ पेरकर या मान्यवरांचा समावेश होता. यावेळी सभागृहात ॲड.श्यामभाऊ तांगडे, डॉ.कमलाकर कांबळे, मनोहर सिरसाट, डॉ.मुकूंद राजपंखे, राम चव्हाण, राजेश करपे, नामदेव जोगदंड, प्रकाश सिरसाट यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. तर गौरव ग्रंथ प्रकाशन समारंभाच्या यशस्वितेसाठी प्रा.डॉ.चेतन सरवदे (चेतन पब्लिकेशन्स), सुधाताई जोगदंड, उत्तम जोगदंड, ॲड.विशाल जोगदंड, समीर मोरे, प्रा.डॉ.शंकर वाघमारे, एम.वाय.काळे, संभाजीराव सोनवणे, व्यंकटराव वेडे, प्रा.संभाजीराव बनसोडे, ॲड.वसंतराव हजारे, शशिकांत सोनकांबळे, प्रा.एम.बी.चव्हाण, डॉ.किरण चक्रे, रामेश्वर खाडे, ॲड.डी.आर.गोरे, दिलीप वैद्य, संजय भोसले, ॲड.विशाल जोगदंड, कल्याण जोगदंड, ॲड.ए.एस.धाईजे, प्रसेनजीत मस्के, संदिपान पोटभरे, भगवानराव ढगे आदींसह इतरांनी पुढाकार घेतला. कार्यक्रमाचे अतिशय सुंदर नियोजन करण्यात आले होते. तसेच उपस्थितांनी सम्यक पांथस्थ आबा हा गौरवग्रंथ मोठ्या प्रमाणावर खरेदी केला. मराठवाड्याच्या विविध भागांतून लोक ग्रंथ प्रकाशन समारंभासाठी आवर्जून उपस्थित राहीले होते. यावेळी आबांवरील प्रेमापोटी चाहत्यांनी कार्यक्रमासाठी सभागृहाच्या आत व बाहेर मोठी गर्दी केली होती.

### जय जवान माध्यमिक

एक असलेल्या बिरसा मुंडा यांचे स्मरण आणि सन्मान करण्यासाठी दरवर्षी ९ जून रोजी बिरसा मुंडा पुण्यतिथी साजरी केली जाते. ब्रिटिश राजवटीविरुद्ध लढण्यासाठी आणि विशेषतः झारखंडमधील आदिवासी लोकांच्या हक्कांचे, संस्कृतीचे आणि जमिनीचे रक्षण करण्यासाठी बिरसा मुंडा यांचे स्मरण केले जाते.बिरसा मुंडा यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी सध्याच्या झारखंडमधील उलिहातू नावाच्या एका छोट्या गावात झाला . ते भारतातील अनेक आदिवासी समुदाया पैकी एक असलेल्या मुंडा जमातीचे होते. फारसे औपचारिक शिक्षण नसतानाही, बिरसा ब्रिटिश शासक, जमीनदार आणि ख्रिश्चन मिशनरी आदिवासी लोकांशी कसे अन्याय्य वागतात हे पाहत मोठे झाले. यामुळे त्यांनी त्यांच्या हक्कांसाठी लढण्याचा दृढनिश्चय केला.दुर्दैवाने, बिरसा मुंडा यांचे निधन खूप लहान वयात झाले. ९ जून १९०० रोजी रांची तुरुंगात असताना त्यांचे निधन झाले तेव्हा ते फक्त २५ वर्षांचे होते . त्यांच्या मृत्यूमागील नेमके कारण अद्याप अस्पष्ट आहे, परंतु त्यांच्या बलिदानाचा भारताच्या स्वातंत्र्यलढ्यावर आणि आदिवासी हक्क चळवळीवर खोलवर परिणाम झाला. अशा या महान विरास भावपूर्ण श्रद्धांजली... विनम्र अभिवादन.

# सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून घडवतंय परिवर्तन

## अर्थव्यवस्था ही होतेय मजबूत; शेतकऱ्यांचा सर्वार्थाने शाश्वत विकास



पतंजली आयुर्वेदचा दावा आहे की ते भारतातील शेतीमध्ये परिवर्तन घडवत आहे आणि कंपनी सेंद्रिय शेतीला ( ) प्रोत्साहन देऊन माती निरोगी आणि शेतकऱ्यांना स्वावलंबी बनवत आहे. कंपनीचे म्हणणे आहे की बाबा रामदेव आणि आचार्य बालकृष्ण यांच्या नेतृत्वाखाली पतंजली भारतीय शेती मजबूत आणि शाश्वत बनवण्यासाठी काम करत आहे. कंपनीचा दावा आहे की, ''पतंजलीचा किसान समृद्धी कार्यक्रम शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती शिकवतो. तो पीक फेरपालट, हिरवळीचे खत बनवणे आणि कंपोस्ट तयार करणे यासारख्या सोप्या पद्धती शिकवतो. यामुळे रासायनिक खतांची गरज कमी होते. पतंजलीने पिकांना मजबूत आणि निरोगी ठेवणारी सेंद्रिय खते आणि माती सुधारणा उत्पादने विकसित केली आहेत.

तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही पाऊल पतंजलीच्या ॲपवरून शेतकऱ्यांना योग्य माहिती

कंपनीने म्हटले आहे की, ''पतंजलीच्या कॉन्ट्रॅक्ट फार्मिंग आणि डिजिटल ॲपवरून शेतकऱ्यांना योग्य किंमत आणि बाजारपेठेची माहिती मिळते. कंपनी मध्यस्थांशिवाय थेट पिके खरेदी करते, ज्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढते.'' तसेच, पतंजली ग्रामीण महिलांना औषधी वनस्पती लागवडीचे प्रशिक्षण देऊन त्यांना स्वावलंबी बनवत आहे. ''

सेंद्रिय शेतीमुळे पाणी स्वच्छ आणि माती ही चांगली

पतंजली कंपनीचे म्हणणे आहे की, ही चळवळ पर्यावरणासाठीही चांगली आहे. सेंद्रिय शेतीमुळे माती सुधारते, पाणी स्वच्छ राहते आणि वनस्पती आणि प्राण्यांची विविधता वाढते. जुन्या भारतीय कृषी ज्ञानाला नवीन तंत्रांशी जोडून पतंजली आपली संस्कृती देखील वाचवत आहे.

पतंजलीचे प्रयत्न गावांची अर्थव्यवस्था ही करतेय मजबूत

कंपनीचा दावा आहे की, ''पतंजलीचा हा प्रयत्न शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारत आहे आणि गावांची अर्थव्यवस्था मजबूत करत आहे. यामुळे भारत सेंद्रिय शेतीमध्ये जगात आघाडीवर राहू शकतो.'' तज्ज्ञांचे म्हणणे आहे की पतंजलीचे मॉडेल शेतीचे भविष्य बदलेल, जे येणाऱ्या पिढ्यांना निरोगी वातावरण आणि समृद्ध शेती देईल.'' पतंजलीचा हा प्रयत्न शेती बदलत आहे आणि पर्यावरणाचे रक्षणही करत आहे. कंपनीच्या योजनांमधून शेतकऱ्यांना आर्थिक फायदा मिळत आहे आणि त्यांच्या सामाजिक जबाबदाऱ्याही पूर्ण होत आहेत. अशा प्रकारे, पतंजलीच्या नवीन पद्धती आणि निष्पक्ष व्यापार भारतीय शेतीला नवीन उंचीवर घेऊन जात आहेत.

# जमीन सुपीकतेसाठी सेंद्रिय खताचे महत्व



जमिनीची सुपीकता जपण्यासाठी जिवाणू खतांचा वापर, आंतरपीक पद्धती, शेणखत, कंपोस्टखत, हिरवळीच्या खतांचा वापर आदी उपायांचा अवलंब करता येतो. त्यामुळे जमिनीचे आरोग्य राखले जाऊन उत्पादन खर्चात देखील बचत होते.

जिवाणू खते : एकदलवर्गीय पिकांसाठी ॲझोटोबॅक्टर, ॲसिटोबॅक्टर, द्विदल वर्गीय पिकांसाठी रायझोबियम, रायझोफॉस, तसेच स्फुरद, पालाश, जस्त या विद्राव्य खतांचा वापर करावा.

आंतरपीक पद्धती : सेंद्रिय शेतीमध्ये मुख्य पिकासोबत द्विदलवर्गीय आंतरपिकांचा समावेश केल्यास मुख्य पिकास व त्यापुढील पिकांना फायदा होतो. त्यामुळे जमिनीमध्ये अन्नद्रव्यांचा पुरवठा होतो. उदा. सोयाबीन अधिक तूर, कापूस अधिक तूर किंवा सोयाबीन इत्यादी.

कंपोस्ट खत निर्मितीच्या पद्धती : पीक काढणीनंतर शेतात उरलेले अवशेष, ग्रामीण व नागरी भागातील निर्माण सेंद्रिय पदार्थ, पालापाचोळा यापासून सूक्ष्म जिवाणूंच्या मदतीने कुजवून कंपोस्ट खत तयार केले जाते. कंपोस्ट खत निर्मितीसाठी विविध पद्धतींचा वापर केला जातो. त्यात ढीग पद्धत, बेंगलोर पद्धत, नाडेप पद्धत, गांडूळखत यांचा समावेश होते.

ढीग पद्धत इंदोर पद्धत :साधारण ६ फूट रुंद, ५ ते ६ फूट उंच व आवश्यकतेनुसार लांबी ठेवून जास्त पावसाच्या प्रदेशामध्ये या पद्धतीद्वारे जमिनीवर ढीग तयार करून खतनिर्मिती केली जाते.

बेंगलोर पद्धत : कमी पावसाच्या प्रदेशामध्ये या पद्धतीने कंपोस्ट खत तयार केले जाते. या पद्धतीमध्ये जमिनीत ३ फूट खोल खड्डा घेऊन लांबी व रुंदीच्या उपलब्धतेनुसार पीक अवशेष टाकले जाते. त्यानंतर ही खते तयार केली जातात.

नाडेप पद्धत : या पद्धतीमध्ये जमिनीवर ३ फूट उंच, ६ फूट रुंद व लांबी आवश्यकतेनुसार ठेवून विटाचे साहाय्याने बांधकाम करून कंपोस्टखत तयार केले जाते.

गांडूळ खत :विटाचे बांधकाम करून किंवा जमिनीमध्ये खड्डा करून गांडूळखत तयार करता येते. त्यामध्ये पिकांचे अवशेष, पालापाचोळा, शेण, माती, उर्वरित पालेभाज्या, बारीक गवत करून गांडूळ खत तयार केले जाते.

हिरवळीच्या खताचे प्रकार : हिरवळीची पिके शेतात वाढवून ती फुलोऱ्यावर येण्यापूर्वी जमिनीत गाडली जातात. त्यापासून उत्तम दर्जाचे खत तयार होते. त्यासाठी ताग, गवार, मूग, मटकी, उडीद, लसूणघास, बरसीम, बोरु, धैंचा, चवळी इत्यादी हिरवळीची पिके फायदेशीर ठरतात. याशिवाय हिरवळीच्या खताचे पीक शेताच्या बांधावर किंवा पडीक जमिनीवर वाढवून त्याच्या कोवळ्या फांद्या व पाने मशागतीवेळी जमिनीत गाडली जातात. उदा. गिरीपुष्प, सुबाभूळ, शेवरी, करंज इत्यादी.

# पावसाळ्यात शेळ्यांचे व्यवस्थापन

राज्यासह देशभरात अनेक शेतकरी हे शेळीपालन करतात. शेळीपालन व्यवस्थापनात सर्वांत जास्त काळजी ही गोठ्यात असणारी आर्द्रता कमी करण्यासाठी घ्यावी लागते. शेळ्यांना आर्द्रता सहन होत नाही, त्यामुळे त्यांना श्वसनसंस्थेचे रोग होण्याची दाट शक्यता असते.

पावसाळ्यात आद्रतेचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे पावसाळ्यात शेळ्यांच्या व्यवस्थापनात त्यानुसार बदल करणे गरजेचे आहे. ज्यामुळे शेळीपालनातील आर्थिक नुकसान कमी करण्यास मदत होते.

जंतुनाशक औषधे द्यावीत : शेळीच्या शरीरावर कोणत्याही प्रकारचा ताण वाढणार नाही, याची काळजी घ्यावी लागते. कळपातील सर्व शेळ्यांना जंतुनाशक औषधे द्यावीत. त्यामुळे कळप जंतमुक्त राहू शकतात. अशावेळी शेळ्यांच्या अंगावर गोचीड होतात. त्यामुळे शेळ्यांना रोग होतात गोचीड शेळयांच्या शरीरातील रक्त शोषतात. त्यामुळे शेळ्या अशक्त होतात. अंगावर खाज सुटते, त्यामुळे शेळ्या बैचेन होतात, खाणे बंद करतात, हालचाल मंदावते यावर उपाय म्हणून शेळ्यांच्या अंगावर गोचीड प्रतिबंधक औषध लावावे किंवा गोठा धुऊन घ्यावा. ज्यामुळे शेळयांना होणाऱ्या आजारांपासून वाचवण्यास मदत होणार आहे.

आर्द्रता कमी ठेवण्यासाठी करा 'हे' उपाय : शेळ्यांना आर्द्रता अजिबात सहन होत नाही, त्या उष्णता सहन करू शकतात. गोठ्यातील आद्रता कमी ठेवण्यासाठी गोठ्यात रात्रीच्या वेळी शेगडी लावावी अथवा ६० वॉटचा विजेचा बल्ब रात्रभर लावून ठेवावा. गोठ्यातील मलमूत्र रोजच्या रोज साफ करून गोठा कोरडा ठेवावा गोठ्यातील जमीन जर ओली असेल तर शेळ्यांच्या पायाच्या खुरामध्ये ओलसर पणा राहून पायाला फोड येतात, यामुळे शेळ्या लंगडतात, ताप येतो, चारा कमी खाते अशक्त होतात.

पावसाळयाच्या दिवसात शेळ्यांना बाहेर सोडू नये. पावसात जास्त वेळ शेळी भिजली की न्यूमोनियासारखा आजार होतो. यामुळे शेळी शिंकते, नाकातून चिकट पांढरा पिवळसर द्रव वाहतो, ताप येतो, धाप लागते. कोवळ्या चाऱ्यामध्ये तंतुमय पदार्थ कमी असतात, जास्त प्रमाणात हा चारा खाल्यामुळे शेळ्यांना अपचन होते. पोटफुगी, हगवणीसारखे आजार होतात.

पोटफुगी होऊ नये यासाठी गोडे तेल आणि खाण्याचा सोडा पाजला तर पोटफुगी कमी होते.




# नवीन फळबागेचे नियोजन; जाणून घ्या योग्य पद्धत

राज्यामध्ये सन १९९०-९१ पासून रोजगार हमी अंतर्गत १०० टक्के अनुदानित फळझाड लागवड ही महत्त्वाकांक्षी योजना सुरु झाली. तेंव्हा पासून फळबाग लागवडीची संकल्पना राज्यातील शेतकऱ्यांच्या मनावर रुजली. फळबाग लागवडीची संकल्पना राज्यातील पडीक जमिनीला मिळालेले वरदान ठरल, अस म्हटल तर वावग ठरू नये.राज्यात आता पर्यंत ३० लाख हेक्टरहून अधिक क्षेत्रावर फळबागा उभ्या आहेत. परंतु अद्याप फळबाग लागवडीमध्ये अपेक्षित असे यश मिळालेले नाही हि वस्तूस्थिती आहे. अशा परिस्थितीत फळबाग लागवड यशस्वी होण्यासाठी ''फळबाग लागवडीची पूर्वतयारी आणि नियोजन'' या महत्वाच्या बाबी आहेत.

फळबागेच्या यशस्वी लागवडीकरिता महत्वाच्या बाबी :

आपल्याकडे जमीन कोणत्या प्रकारची आहे?अ ापल्या जमिनीत फळझाडे येतील का?बारमाही पाण्याची व्यवस्था आपल्याकडे आहे का?आपल्या हवामानात फळझाडे कोणत्या प्रकारची येऊ शकतील? मातीची व पाण्याची तपासणी केली आहे काय?बागेसाठी उत्तम जातीवंत कलमे कोठून उपलब्ध होऊ शकतील?जी बाग आपण लावणार आहोत त्यास बाजारपेठ उपलब्ध आहे काय?प्रक्रिया उद्योग आहेत काय? अशा सर्व बाबींचा विचार केल्यानंतरच आपणास कोणती फळझाडे लावायला हवीत याचा विचार करणे महत्वाचे ठरते. फळबाग म्हणजे ५ ते ६ महिन्याच्या पिकांच्या मशागतीची गोष्ट नसते, तो एक दिर्घकाळ चालणारा व्यवसायाच म्हणायला हरकत नाही. फळबागेसाठी जमिनीची निवड करताना तिचा निचरा उत्तम असणे आवश्यक आहे. फळबागेसाठी कमीत कमी १ मीटर खोलीनंतर मुरमाचा थर असणारी जमिन निवडावी. भरपूर सेंद्रिय कर्ब असणारी, भुसभुशीत,मध्यम पोताची जमिनीचा सामू ६ ते ७.५ पर्यंत असावा. मुक्त चुनखडीचे प्रमाण १० टक्क्यापेक्षा कमी असावे.



फळबागेसाठी पाण्याची उपलब्धता :

बागायती फळझाडांना नियमित पाणी द्यावे लागते,अशा बागायती फळझाडांची लागवड करताना कितपत पाणीपुरवठा पुरेल किंवा पाण्याची उपलब्धता किती आहे, याचा विचार करूनच नियोजन करावे. कोरडवाहू फळपिकांना लागवडीच्या सुरुवातीस पहिली तीन ते चार वर्ष पाण्याची, चांगल्या व समाधानकारक वाढीसाठी पाण्याची आवश्यकता असते. ज्या फळझाडांना बाराही महिने पाणी लागते अशा फळझाडांची निवड करावी. आपल्याला पाणी आठ महिने पुरत असेल तर पेरू सारखी फळझाडे लावावीत. इआपले पाणी फक्त सहा महिने पुरत असेल तर सीताफळ, रामफळ, आवळा, बोर या सारखी कोरडवाहू फळझाडांची लागवड करावी.

हवामानानुसार फळपिकांची लागवड :

महाराष्ट्रातील शेतकरी या बाबतीत खरोखरच भाग्यवान आहेत, कारण आपल्या राज्यात सफरचंद वगळता बहुतेक फळझाडांची यशस्वी लागवड करता येते.

कारण आपल्या राज्यातील हवामान फळबाग लागवडीसाठी खुपच अनुकूल आहे.यामुळे हवामांनाच्या बाबतीत फळबाग लागवड करताना शेतकऱ्यांना फारसा विचार करावा लागत नाही.आपल्या राज्याचा विचार करता पश्चिम महाराष्ट्रात आंबा, केळी, चिकू, पपई, नारळ अशा प्रकारची फळझाडे घ्यावीत.पूर्वेकडील उष्ण व कोरड्या हवामानात संत्रा, मोसंबी, कागदी लिंबू, पेरू, द्राक्षे, डाळिंब यासारखी फळझाडे घ्यावीत.कोकणसारख्या अति पावसाच्या भागात चिकू, नारळ, फणस, आंबा काजू यासारखी फळझाडे घ्यावीत.अति कमी पावसाच्या भागात बोर, सीताफळ, आवळा, चिंच अशी कोरडवाहू फळझाडे घ्यावीत.

वाहतुकीच्या दृष्टीने फळबागेचे ठिकाण :

जमिनीचे वाहतुकीच्या दृष्टीने स्थान अत्यंत महत्वाचे आहे. आपली जमीन वाहतुकीच्या रस्त्यापासून दूर असेल तर बागेला लागणारे साहित्य जागेवर पोहोचविणे; फळे वाहतुकीच्या सोयीच्या जाग्यावर आणणे याचा खर्च वाढतो.अनेकदा शेतकरी भावनेच्या भरत भलत्याच जागी फळबाग लावतात आणि साहित्य व फळे मजुरांच्या डोक्यावर वाहून नेण्याचा खर्च प्रचंड वाढून बागेतून फायदा काही हाती लागत नाही.त्यामुळे सुरुवातीलाच वाहतुकीच्या दृष्टीने नियोजन करण आवश्यक आहे.

फळबाग यशस्वी करण्यासाठी महत्वाच्या टिप्स

जमिनीची निवड,हवामानानुसार फळझाडांची लागवड,पाण्याची उपलब्धता,फळबागेची आखणी, योग्य कलमांची निवड, लागवडीची योग्य वेळ आणि लागवड केलेल्या रोपांची काळजी,या सर्व बाबी लक्षात घेऊन योग्य नियोजन केल्यासं फळबाग नक्कीच फायद्याची ठरेल.अत्याधुनिक तंत्रज्ञान,व्यापक दुरद्रृष्टी, उच्चध्येये, ती प्रत्यक्ष साकारण्यासाठी प्रयत्न अभ्यासाची पराकाष्टा, उद्योजक वृत्ती या बाबी केंद्रस्थानी ठेवल्या तर निश्चितच आपली फळबाग रोल मॉडेल्? ठरेल यात शंका नाही.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६६५ : शिवाजीमहाराजांनी राजा जयसिंगची भेट घेऊन त्यांच्याबरोबर सलोख्याची बोलणी करण्यासाठी त्याच्या शिबिरामध्ये प्रवेश केला.
१७७६ : अमेरिका देशाला स्वातंत्र्य घोषित करण्यासाठी घोषणापत्र तयार करण्यासाठी समितीची स्थापना करण्यात आली.
१८६६ : अलाहाबाद उच्च न्यायालयाची स्थापना.
१८९५ : पॅरिस-बॉर्डोक्स-पॅरिस ही इतिहासातील पहिली ऑटोमोबाईल रेस किंवा पहिली मोटर रेस झाली.
१९०१ : न्यूझीलंडने कूक बेटे बळकावली.
१९०७ : नॉर्थनम्प्टनशायर क्रिकेट संघ १२ धावांत सर्वबाद.
१९२१ : ब्राझील देशांतील महिलांना मतदान करण्याचा अधिकार प्राप्त झाला.
१९३५ : एडविन आर्मस्ट्राँगने पहिल्यांदा एफ.एम. लहरींचे प्रसारण केले.
१९३७ : जोसेफ स्टालिनने आपल्याच ८ लष्करी अधिकार्यांना ठार केले.
१९५५ : जगातील पहिल्या मैग्नेशियम जेट विमानाने भरारी घेतली.
१९६४ : पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या इच्छेप्रमाणे त्यांच्या अस्थ्या संपूर्ण देशभर विसर्जित करण्यात आल्या.
१९७० : ॲनामे हेस, एलिझाबेथ पी. हॉइसिंग्टन या अमेरिकन सैन्यातील पहिल्या स्त्री जनरल झाल्या.
१९७२ : दारू पिउन रेल्वे चालवल्यामुळे एल्थाम वेल हॉल येथे रेल्वे अपघात होऊन ६ जण ठार व १२६ जण जखमी झाले.
१९९७ : सुखोई-३०के ही रशियन बनावटीची विमाने भारतीय हवाई दलात दाखल.
१९९८ : कॉम्पॅक कॉम्पुटर कंपनी ने डिजिटल एक्विपमेंट कॉर्पोरेशन विकत घेण्यासाठी ९ अब्ज अमेरिकी डॉलर मध्ये इतिहासातील सर्वात मोठा सौदा केला.
१९८७ : १६० वर्षाच्या कालखंडात ब्रिटीश देशाच्या पंतप्रधान पदावर सलग तिसऱ्यांदा विराजमान होणाऱ्या पंतप्रधान मागरिट थॅचर या पहिल्या ब्रिटीश नागरिक ठरल्या.
२००४ : कॅसिनी-हायगेन्स अंतराळयान शनिचा उपग्रह फीबी जवळून गेले.
२००७ : बांगलादेशातील चितगावमध्ये भूस्खलनामुळे १३० लोक ठार झाले.
२००८ : भ्रष्ट्राचाराच्या आरोपाखाली तुरुंगात कैद असलेल्या बांगलादेशाच्या पूर्व पंतप्रधान शेख हसीन वाजेद यांची सुटका करण्यात आली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१५ : भारतीय-श्रीलंकन छायाचित्रकार जुलिया मार्गारेट कॅमेरॉन यांचा जन्म. (मृत्यू: २६ जानेवारी १८७९)
१८८० : अमेरिकेचे पहिले संसद सदस्य रैफिन यांचा जन्मदिन.
१८९४ : टोयोटा मोटर कंपनीचे संस्थापक काइचिरो टोयोडा यांचा जन्म. (मृत्यू: २७ मार्च १९५२)
१८९७ : क्रांतिकारक रामप्रसाद बिस्मिल यांचा जन्म. (मृत्यू: १९ डिसेंबर १९२७)
१९०९ : भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश व राजकारणी तसचं, निट्टे एज्युकेशन ट्रस्टचे संस्थापक के.एस. हेगडे यांचा जन्मदिन.
१९२४ : साली भारतीय व्यंगचित्रकार, पत्रकार आणि लेखक अत्तूपुरथू मॅथ्यू अब्राहम उर्फ अबू अब्राहम यांचा जन्मदिन.
१९३७ : साली पद्मभूषण व संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय नर्तक, नृत्यदिग्दर्शक आणि शैक्षणिक तसचं, नालंदा नृत्य संशोधन केंद्राच्या संस्थापक-दिग्दर्शिका आणि मुंबईतील नालंदा नृत्य कला महाविद्यालयाच्या संस्थापक-प्राचार्या कनक रेले यांचा जन्मदिन.
१९४२ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित भारतीय उत्प्रेरक वैज्ञानिक, आणि औद्योगिक संशोधन परिषदेच्या राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे माजी संचालक पॉल रत्नसामी यांचा जन्मदिन.
१९४८ : बिहारचे मुख्यमंत्री लालूप्रसाद यादव यांचा जन्म.
१९८२ : टंबलर चे सहसंस्थापक मार्को आर्मेंट यांचा जन्म.
१९८९ : भारतीय पॅरा-बॅडमिंटनपटू मानसी गिरीशचंद्र जोशी यांचा जन्मदिन.
१९९० : साली अर्जुन पुरस्कार सन्मानित भारतीय हॉकी पटू सविता पुनिया यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

३२३ई.पुर्व : मॅसेडोनियाचा राजा अलेक्झांडर द ग्रेट यांचे निधन. (जन्म: २० जुलै ख्रिस्त पूर्व ३५६)
१७२७ : इंग्लंडचा राजा जॉर्ज (पहिला) यांचे निधन. (जन्म: २८ मे १६६०)
१९०३ : सर्बियाचा अलेक्झांडर (पहिला) यांची सर्बियन पत्नी ड्रगा माशिन यांचे निधन. (जन्म: ११ सप्टेंबर १८६४)
१९२४ : इतिहासाचार्य, लेखक, नाटककार व कवी वासुदेव वामन तथा वासुदेवशास्त्री खरे यांचे निधन. (जन्म: ५ ऑगस्ट १८५८)
१९५० : प्रसिद्ध महाराष्ट्रीयन मराठी भाषिक लेखक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि स्वातंत्र्यसेनानी तसचं, भारतीय राष्ट्रीय शिक्षक म्हणून ओळखले लोकप्रिय असणारे पांडुरंग सदाशिव साने उर्फ साने गुरुजी यांचे निधन.
१९८३ : घन:श्याम बिर्ला, भारतीय उद्योगपती. (जन्म: १० एप्रिल १८९४)
१९९७ : भारतीय सर्वोत्कृष्ट राष्ट्रीय पुरस्कार पद्मश्री व पद्मभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय दूर अंतरीय जलतरणपटू आणि व्यावसायिक तसचं, इग्लिश खाडी पार करणारे पहिले भारतीय नागरिक मिहीर सेन यांचे निधन. (जन्म: १६ नोव्हेंबर १९३०)
२००० : राजेश पायलट, अखिल भारतीय काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री. (जन्म: १० फेब्रुवारी १९४५)

# शेतरस्ता खुला करून देण्याच्या मागणीसाठी आमरण उपोषण सुरु

## जिल्हा प्रशासन मात्र सस्ती अदालत नावाखाली आपली पाठ थोपटून घेऊन पत्रकबाजी करण्यात व्यस्त

वैद्यकिन्ही। प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील वैद्यकिन्ही येथील शेतकरी पिराजी उत्तमराव शिंदे हे वैद्यकिन्ही,वैजाळा या दोन्ही गावांच्या मधला गट नंबर २५४ मधील पश्चिमेकडे जाणारा शिवरस्ता काही शेतकऱ्यांनी जाणिवपूर्वक बंद केल्याने शेतात जाण्यायेण्यासाठी अडचण येत असुन तातडीने खुला करून देण्यात यावा यासाठी जिल्हाधिकारी बीड आणि तहसीलदार पाटोदा यांना दि.०५ जुन रोजी लेखी निवेदनाद्वारे सहकुटुंब आमरण उपोषणाचा इशारा देऊनही त्याची दखल प्रशासनाने न घेतल्याने आज दि.११ वार बुधवार रोजी सकाळी १० वाजल्यापासून वैद्यकिन्ही ग्रामपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसले असुन आमरण उपोषणात पिराजी उत्तमराव शिंदे, पत्नी वैशाली पिराजी शिंदे, आई गंगुबाई उत्तम शिंदे, मुलगा शिवराम पिराजी शिंदे आणि ३ मुली दिक्षा,प्रतिक्षा, दुर्वा पिराजी शिंदे सहकुटुंब उपोषणाला बसले आहेत.




मात्र एरवी पेपरबाजी करणा-या जिल्हा आणि तहसील प्रशासनाला यांच्याकडे लक्ष द्यायला वेळ नाही.नायब तहसीलदार मुळे यांनी फोनवरून २-३ दिवसात प्रश्न सोडवु तुम्ही उपोषण मागे घ्या असा सल्ला दिला तर पिराजी शिंदे हे शिवरस्ता खुला करून दिल्याशिवाय उपोषण मागे घेणार नाहीत यावर ठाम आहेत.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी शेतकऱ्यांना शिवरस्ते खुले करून देणार यासाठी विभागीय आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली ''सस्ती अदालत'' उपक्रम राबविण्यात येत असल्याचे तसेच दर सोमवारी तहसील कार्यालयात जनता दरबार घेऊन प्रश्न निकाली काढण्यात येणार असल्याची दैनिकातुन प्रसिद्धीही दिली. मात्र वास्तवात शेतकऱ्यांना शिवरस्ते खुले करून देण्यात यावेत या मागणीसाठी सहकुटुंब आमरण उपोषणाला बसावे लागते आहे.त्यामुळे जिल्हा व तहसिल प्रशासनाने स्टंटबाजी न करता शेतकऱ्यांना न्याय द्यावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

## शाळा वाचवण्यासाठी अमोल जाधववर आत्मदहनाचा इशारा देण्याची वेळ

बीड। प्रतिनिधी

एकीकडे येत्या शैक्षणिक वर्षापासून पहीलीपासुन विद्यार्थ्यांना सीबीएसई पॅटर्न राबविण्यात येणार आहे त्यामुळे गावच्या मुलांनी इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे न जाता गावातीलच जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षण घ्यावे यासाठी २५% पटसंख्या वाढीचे उद्दिष्ट शासनाने दिले असून त्यासाठी आवश्यक सूचना दिलेल्या आहेत.जिल्हापरीषदेच्या शाळांमध्ये पटसंख्या वाढविण्यासाठी शिक्षकांनी जुनच्या पहिल्या आठवड्यापासून कामाला लागण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. मात्र याचवेळी केज तालुक्यातील नांदुरघाट येथील जिल्हा परिषदेची शाळा वाचवण्यासाठी शालेय शिक्षण समिती अध्यक्ष अमोल सखाराम जाधव यांनी शिक्षण विभाग व जिल्हा प्रशासन सहकार्य न करता खाजगी संस्था चालकांचे हित जोपासत अडथळे निर्माण करत असल्याने दि.१४ जुन रोजी शाळेच्या प्रांगणात आत्मदहनाचा इशारा जिल्हा प्रशासनाला दिला आहे. अमोल जाधव यांच्या न्याय मागण्या मान्य करून त्यांना आत्मदहनापासुन परावृत्त करण्यात यावे हि शासन आणि प्रशासनासाठी लाजीरवाणी बाब असल्याचे म्हणत मुख्यमंत्री, पालकमंत्री बीड, शिक्षणमंत्री, विभागीय आयुक्त यांना जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद बीड यांच्या मार्फत लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

नांदुरघाट येथील जिल्हा परिषद शाळा वाचविण्यासाठी नांदुरघाट ग्रामस्थांचा लढा गेल्या १८ महिन्यांपासून सुरू असुन जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांना घरपट्टी, नळपट्टी आदी ग्रामपंचायतने करमाफी देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.तसेच शाळेत सीसीटीव्ही, शैक्षणिक साहित्य आणि पटसंख्या भरपूर असुन विद्यार्थ्यांना उत्तेजन देणारे उपक्रम राबविण्यात येत असुन गुणवत्तापूर्ण विद्यार्थी आहेत. शाळेमध्ये सर्वांगीण विकासासाठी नांदुरघाट ग्रामसथ मोलाचे योगदान देत आहेत. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये पटसंख्या वाढविण्यासाठी शिक्षकांनी जनजागृती करावी,पालकांशी संपर्क करावा, सर्वेक्षण, अंगणवाडी,गृहभेटीतुन जनजागृतीचे उपक्रम राबवुन पटसंख्या किमान १५ ते २५ टक्के जास्त वाढविण्याचे निर्देश शिक्षण आयुक्तांनी दिले आहेत.सर्वात जास्त पटनोंदणी केलेल्या शाळांचा गौरव करण्यात येणार आहे आणि दुसरीकडे नांदुरघाट येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत पटसंख्या वाढविण्यासाठी प्रयत्नशील ग्रामस्थांची अडवणूक केली जात असुन असा दुजाभाव का?? त्यासाठी अमोल जाधव अध्यक्ष शालेय शिक्षण समिती यांच्यावर आत्मदहनाची वेळ यावी हा ढोंगीपणा नाही का?? असा संतप्त सवाल डॉ.गणेश ढवळे यांनी उपस्थित केला आहे.

## देशसेवेसाठी लढणाऱ्या विरांचा परिवार हा भाग्यशाली असतो-डॉ. प्रकाश आनंदगांवकर

### लेफ्टनंट कर्नल सुमित पवार यांचा माजलगावात सन्मान




माजलगाव, प्रतिनिधी: देशसेवेसाठी लढणारे विर हे राष्ट्राच्या व देशवासीयांच्या संरक्षणासाठी जिवाची बाजी लावतात. व्यक्तीगत जिवन आणि पारिवारिक जिवनाचा त्याग करून या विरांना राष्ट्राच्या हितासाठी केंव्हाही, कधीही सिमेवर जावुन शत्रुशी लढावे लागते. हा परिवारासाठी, समाजासाठी व त्या - त्या कुटूंबासाठी गौरवच आहे. लेफ्टनंट कर्नल सुमित पवार हे माजलगावचे जावाई असले तरी ते भारतमातेचे सुपुत्र आहेत. त्यामुळे देशसेवेसाठी लढणा-या या विराचा सर्व परिवार हा भाग्यशाली असल्याचे गौरवोद्गार डॉ. प्रकाश आनंदगांवकर यांनी काढले.

लेफ्टनंट कर्नल सुमित पवार यांचा सैन्यदलात मेजर या पदावरून लेफ्टनंट कर्नल ही पदोन्नतीबद्दल त्यांच्या त्यांच्या पत्नी सौ. भाग्यश्री पवार यांच्या वतीने आयोजित केलेल्या सन्मान सोहळ्यात बळीराजा हॉटेलमध्ये दि. ९ जुन रोजी बोलत होते. यावेळी सेवानिवृत्त डिवायएसपी श्रीधर पवार, सौ. सविता श्रीधर पवार, नारायण डक, सौ. ज्योती डक, माजी आ. मोहनरावकाका सोळंके, मा. आ. हरिभाउ लहाने, लक्ष्मण डक, किशनराव नाईकनवरे, सहाल चाउस, अर्जुन गायकवाड, राहुल महाडिक, सौ. हर्षदा महाडिक, बबनराव सरवदे, सतिष दुगड, परमेश्वर सोळंके, कल्याण कदम, प्रा. संदिपान डाके, प्रा. रामेश्वर मगर, वामनराव डक, ॲड. बी. आर. डक, व्यंकट डक, डॉ. सचिन डक, इनायत खान, प्रताप सोळंके, उमेश मोगरेकर, तुकाराम येवले, विष्णु साबळे, तुषार डक, किशोर डक, महाविर मस्के यांचेसह अनेक प्रमुख मान्यवर उपस्थित होते. या सन्मान सोहळ्यात लेफ्टनंट कर्नल सुमित पवार यांचे वडील श्रीधर पवार बोलतांना म्हणाले की, माझा मुलगा हा लहानपणापासुनच राष्ट्रप्रेमी व भावनिक आहे. तो भारतीय सैन्यदलात स्वतःच्या ईच्छेने व आवडीने भरती झाला आम्हीही आई - वडीलांनी त्याला अडविण्याचे काम केले नाही. आज तो याठिकाणी आहे तो त्याच्या कर्तुत्वावर व राष्ट्रप्रेमावर आहे. त्याचे भविष्य उज्वल असुन तो भारत मातेच्या सेवेसाठी मोठी भरारी घेईल असा विश्वास व्यक्त केला तर यावेळी त्यांचे सासरे नारायण डक म्हणाले की, माझी मुलगी भाग्यश्री हीचा विवाह सुमित यांचेशी जुळवितांना ते सैन्यदलात आहेत हे समजल्यावर नातेवाईकांसह आम्हीही विचारात पडलो होतो परंतु माझी मुलगी धाडसी असुन भाग्यश्रीनेच आपल्या आयुष्याचा जोडीदार सुमित पवार यांना निवडण्यास पसंती दिली आणि ही पसंती आभिमानास्पद असल्याचे त्यांनी सांगीतले. यावेळी लेफ्टनंट कर्नल सुमित पवार यांचा सासरवाडी माजलगावच्या वतीने अनेक मान्यवरांनी यथोचित सत्कार केला व त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. सर्व उपस्थितांचे आभार भाग्यश्री पवार - डक यांनी मानले.

## निवड व वरिष्ठ वेतन श्रेणी,वैद्यकीय बिले तसेच महागाई भत्त्यासाठी बेमुदत धरणे आंदोलन : कास्ट्राईब

माजलगाव। प्रतिनिधी

तालुक्यातील शिक्षक कर्मचारी बांधवांचे गेल्या अनेक वर्षापासून जिल्हा परिषद बीड स्तरावर प्रलंबित असलेले निवड व वरिष्ठ वेतन श्रेणी मिळून ३२ प्रस्ताव वैद्यकीय बिले ३९ प्रस्ताव व महागाई भत्त्याच्या संदर्भातील प्रश्नांची सोडवणूक होत नसल्याकारणाने महा.राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या वतीने शिक्षणाधिकारी (प्रा) यांना गटशिक्षणाधिकारी माजलगाव यांच्यामार्फत निवेदन देण्यात आले आहे.गटशिक्षणाधिकारी कार्यालयासमोर नवीन शैक्षणिक वर्षाच्या दुसऱ्याच दिवसापासून म्हणजे दि १७ जून पासून बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार आहेत.

वरिष्ठ पातळीवरील अधिकाऱ्यांनी नियमित सेवा बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांवर अन्याय करून त्यांचे मूलभूत अधिकार डावलले आहेत.राज्य शासनाच्या नियमानुसार सेवा कालावधीनुसार निवड व वरिष्ठ वेतनश्रेणी बंधनकारक आहे.मात्र अनेक कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव विविध टप्प्यावर प्रलंबित असून,त्याचे निराकरण होत नाही.परिणामी कर्मचारी आर्थिक व मानसिक त्रास सहन करत आहेत.तसेच शासकीय नियमानुसार अधिकृत रुग्णालयामधून केलेले उपचारानंतर सादर केलेली वैद्यकीय बिले मंजूर करणे बंधनकारक असतानाही,महिन्यानंतरही ती मंजूर न होणे ही गंभीर बाब आहे.त्यामुळे अनेक कर्मचाऱ्यांना वैयक्तिक कर्ज काढावे लागत आहे.काही प्रकरणांमध्ये कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांच्या उपचारासाठी वेळेत मदत न मिळाल्याने गंभीर परिणाम झाले आहेत.केंद्र व राज्य शासनाकडून महागाई भत्ता वेळोवेळी जाहीर केला जातो.मात्र संबंधित भत्याची अंमलबजावणी व आदा यामध्ये विलंब होत आहे. शासनाने २०२४ मध्ये महागाई भत्ते बाबत स्पष्ट निर्देश दिले असताना सुद्धा प्रत्यक्ष पातळीवर त्याची अंमलबजावणी करण्यात दिरंगाई व टाळाटाळ होताना दिसून येत आहे.या सर्व प्रकरणाची सोडवणूक व्हावी व दप्तर दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर-कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करण्यात यावी या आशयाचे वरिष्ठ पातळीवर बेमुदत धरणे आंदोलनाचे निवेदन दिले असताना सुद्धा त्यावर कोणतीच कारवाई होताना दिसून येत नाही.त्यामुळे बेमुदत धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले आहेत.आणि भविष्यातही जर याची दखल घेतली गेली नाही तर,या आंदोलनाची व्याप्ती निश्चितच वाढत जाणार आहे.असा इशारा महासंघाचे जिल्हा संघटन प्रमुख भारत टाकणखार,ता.सचिव अभिमन्यू इबिते.जि.उपाध्यक्ष वसंत टाकणखार,रवी आदमाने,हनुमंत पांढरपोटे,राजेंद्र सातपुते,शिवाजी भाळशंकर,राहुल खुणे,गोरख उघडे,निलेश गावडे,किरण शिंदे,नारायण भाळशंकर,अमोल राऊत,धोंडीराम रामुळे,जीवन डोंगरे,किरण माने,सय्यद आयुब नागनाथ पडलवार,प्रवीण जाधव,सुमित घाडगे,गोविंद पवार,शंकर पवार,बळीराम घनगाव,नितीन पुटवाड,शेख मतीन,विजय वैराग्य,अविनाश येळंबकर,कृष्णा हौसरमल,राजकुमार सोनवणे,प्रतीक स्वामी व तालुकाप्रमुख राहुल टाकणखार यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

## महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी भागवत गव्हाणे

धारूर। प्रतिनिधी



धारूर तालुक्यातील धुनकवाड येथील युवा सरपंच भागवत प्रभाकर गव्हाणे यांची सरपंच ग्रामसेवा परिषदेच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी निवड झाली असून त्यांच्यावर अभिनंदनाचा व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. गेल्या दोन वर्षांपूर्वी धुनकवाड येथील ग्रामपंचायतची निवडणूक झाली आणि या निवडणुकीत मातब्बराला पराभवाची धूळ चारत मोठ्या मताधिक्यांनी चितपट करत फक्त आठ मतं असलेले गोपाळ समाजातील कुटुंबाच्या व्यक्तीला धुनकवाडकरांनी भरभरून प्रतिसाद देऊन मोठ्या मताधिक्याने निवडुन दिले.

भागवत गव्हाणे हे गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक व राजकीय कार्यात अग्रेसर आहेत.त्यांनी अनेक निराधारांना आधार देण्याचे काम केले आहे.ही काम करण्याची पद्धत व आवड असल्यामुळे व त्यांच्या कामाची दखल घेऊन धुनकवाडचे युवा सरपंच भागवत गव्हाणे यांना सरपंच ग्रामसेवा परिषदेच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी निवड करुन सरपंचासाठी काम करण्याची संधी मिळाली आहे.भागवत गव्हाणे म्हणाले की,मी सरपंचासाठी चांगले काम करेल व सरपंचांना काही अडचणी भासल्यास त्याचा पाठपुरावा करून त्या सोडवण्यासाठी मी कटीबद्ध राहिल व माझ्यावर जी जबाबदारी दिली आहे ती मी चांगल्या पद्धतीने पार पाडेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तरी भागवत गव्हाणे यांची निवड जाहीर होताच त्यांच्यावर सर्वस्तरातून अभिनंदनाचा व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## नैसर्गिक पाण्याच्या प्रवाहातील अडथळे दूर करा

### तहसीलदार घोळवे यांचे ग्राम पंचायतीना आदेश

शिरूर: शंकर भालेकर



गाव शिवारातुन वाहणाऱ्या नदी, नाले, ओढ्यांच्या पाणी प्रवाहामुळे शेतकऱ्यांच्या होणाऱ्या संभाव्य नुकसानी टाळण्यासाठी ग्रामपंचायत अधिकारी यांनी सरपंचाच्या अध्यक्षतेखालील आपत्ती व्यवस्थापन समितीकडून प्रवाहाला निर्माण झालेल्या अडथळ्यांना दूर करावे असे आदेश शिरूर कासारचे तहसीलदार सुरेश घोळवे यांनी तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतीना पत्राद्वारे दिले आहेत.

शिरूर तालुक्यातील अनेक गावात नदी,नाला, ओढ्यालगत असलेल्या शेतकऱ्यांनी नदी नाला ओढ्याच्या काठालगत तर काही ठिकाणी पात्रामध्ये विहिरीचे खोदकाम केलेले आहे. हे खोदकाम करताना विहिरीतून निघालेले मटेरियल जसे की, दगड, मुरूम,खरीप हे नदी, नाला, ओढ्याच्या पात्रामध्ये भराव टाकून नैसर्गिक पाण्याच्या प्रवाहाला अडथळा निर्माण केला आहे. परिणामी आगामी काळामध्ये जोरदार पाऊस अथवा अतिवृष्टी होऊन पूर आल्यास पुराचे पाणी बाजूच्या शेतकऱ्याच्या शेतामध्ये जाऊन शेतकऱ्याचे मोठे नुकसान होत आहे. तर काही ठिकाणी अशा अडथळ्या गावातील घरामध्ये पाणी जाण्याचा संभाव्य धोका निर्माण होऊ लागला आहे. नैसर्गिक पाण्याच्या प्रवाहाला अडथळा निर्माण होत असल्याने शेतकरी आपापसात भांडण तंटे करत आहेत. अशा प्रकारच्या अनेक तक्रारी शिरूर तहसील कार्यालयाला प्राप्त झाल्या असल्यामुळे तक्रारीची दखल घेऊन शिरूर तहसीलदार सुरेश घोळवे यांनी नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ याचाच अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणून तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना पत्र दिले आहे. या पत्रामध्ये ग्रामपंचायत अधिकारी यांनी ग्राम स्तरावर सरपंच महोदय यांच्या अध्यक्षतेखालील आपत्ती व्यवस्थापन समितीने गावातील सर्व नैसर्गिक पाण्याच्या प्रवाहाची पाहणी करून गाव शिवारा अंतर्गत असलेल्या नदी, नाला, ओढ्यांच्या प्रवाहातील अडथळे दूर करावे करावेत व शेतकऱ्यातील आपापसातील भांडणे मिटवावीत असे तहसीलदार घोळवे यांनी पत्राद्वारे आदेशित केले आहे.

## कर्जमाफीसह बच्चूकडू यांच्या मागण्या तात्काळ मान्य करा - शेकाप

माजलगाव। प्रतिनिधी

गेल्या तीन दिवसापासून शेतकऱ्यांच्या कर्जमाफी सह विविध मागण्यासाठी बच्चू कडू यांचे अन्नत्याग आंदोलन सुरू असून या आंदोलनाकडे मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री यांच्यासह मंत्री मंडळ जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असून निवडणुकीपूर्वी कर्जमाफीची घोषणा करणारे शिंदे, फडणवीस, अजित पवार सत्ता मिळाल्यानंतर त्या तिन माकडा प्रमाणे एक बोलत नाही, एकाला ऐकू येत नाही आणि एकाला दिसत नाही.म्हणजेच मुक्या, आंधळ्या, बहिऱ्या सारखी अवस्था या सरकारची झाली, शेतकरी कामगार पक्ष शेतकऱ्यांच्या प्रश्नावर कायम आक्रमकपणाने लढत आला असून




बच्चू कडू यांच्या कर्ज माफीसह सर्वच मागण्या तात्काळ मान्य कराव्यात या मागणीसाठी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने माजलगाव येथील उपविभागीय अधिकारी श्री गौरव इंगोले यांना निवेदन दिले असून शासनाने शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहुन दोन दिवसात मागण्या मान्य करून बच्चू कडू यांचे अन्नत्याग आंदोलन स्थगित करावे, अन्यथा शेतकरी कामगार पक्षाच्या नेतृत्वाखाली तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा इशारा, निवेदनाद्वारे सरकारला दिला आहे. यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड नारायण गोले पाटील यांच्यासह भाई श्रीराम शेवाळे, भाई सलीम खान, परमेश्वर डाके, सतीश बुरंगे, भाई मुंजा पांचाळ, भाई सतिश शेजुळ, अशोक बप्पा कुलकर्णी,भाई राहुल सोळंके, भाई माऊली चंदनशिव,भाई चांगदेव शेजुळ, भाई साळुजी हांडे आदिंच्या निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत.

### टीसी हरवला आहे

**विश्वजीत चंदन मिटकरी या नावाचा १२ वी पास टी सी चौसाळा ते बीड प्रवास करताना हरवला आहे सापडल्यास आणून द्यावा**

**संपर्क : ९४२१७४५५५५**

### टीसी हरवला आहे

**कु. वैष्णवी प्रशांत बगाडे या नावाचा बारावी विज्ञान शाखेचा (शैक्षणिक वर्ष २०२१- २०२२ शिवनी उच्च माध्यमिक विद्यालय शिवनी) चा टीसी बीड बस स्थानक ते शिवनेरी कॉलनी परिसरात हरवला आहे. सापडल्यास कृपया खालील पत्त्यावर आणून द्यावा.**

**संपर्क :९४२२९८१२१६**

## शासकीय वसतिगृहात आदिवासी मुला-मुलींची प्रवेश प्रक्रिया सुरु

बीड । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरात शिक्षण घेत असलेल्या इयत्ता ८ वी पासून पुढील वर्गातील सर्व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांनी आदिवासी विकास विभागामार्फत चालविल्या जाणा-या अंबाजोगाई येथील आदिवासी मुलां मुलींच्या शासकीय वसतिगृहासाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली आहे.तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी संकेत स्थळावर जावून ऑनलाईन अर्ज करावेत.

काही अडचण आल्यास गृहपाल, आदिवासी मुलांचे- मुलींचे शासकीय वसतिगृह अंबाजोगाई जि. बीड यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृहाचे गृहपाल यांनी केले आहे.

## परिक्षक व नियामक यांचे पेपर तपासणीचे मानधन तत्काळ द्या

### मराठवाडा शिक्षक संघाची मागणी

जालना। प्रतिनिधी

फेब्रुवारी मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी बोर्ड परिक्षेच्या तपासलेल्या उत्तर पत्रिकांचे मानधन तात्काळ देण्यात यावे असी मागणी मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय सचिव यांच्याकडे करण्यात आली आहे.

याबाबत मराठवाडा शिक्षक संघाचे सचिव संजय येळवंते यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी / मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी बोर्ड परीक्षेच्या उत्तर पत्रिका तपासलेल्या परीक्षक व नियामकांना दिले जाणारे मानधन शिक्षण मंडळाने अद्याप पर्यंत दिले नाही तरी ते त्वरीत देण्यात यावे अशी मागणी मराठवाडा



शिक्षक संघाचे छत्रपती संभाजीनगरचे सचिव भाई चंद्रकांत चव्हाण व जालन्याचे सचिव संजय येळवंते यांनी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या सचिव यांना प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन देऊन केली आहे.

सदरील मागणीकडे दुर्लक्ष केल्यास व वेळकाढूपणाचे धोरण अवलंबविल्यास मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव व सरचिटणीस राजकुमार कदम यांच्या मार्गदर्शना व नेतृत्वाखाली आपल्या कार्यालयासमोर तीव्र आंदोलन केले जाईल असा इशारा निवेदनात दिला आहे.सदरील निवेदन मंडळाच्या उपसचिव प्रियाराणी पाटील यांनी स्विकारले.

निवेदनावर मराठवाडा शिक्षक संघाचे छत्रपती संभाजीनगर जिल्हा सचिव भाई चंद्रकांत चव्हाण, जालना जिल्हा सचिव संजय येळवंते यांच्यासह संघटनेचे ए.एस.ढमढेरे, व्ही.ई.चव्हाण, व्ही.आर.सोलाटे,विनोद केनेकर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# चाकरवाडीत वारकऱ्यांचा कुंभमेळा आणि भक्तीचा संगम - माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

**नेकनूर । प्रतिनिधी**

**विसाव्या शतकातील संत ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या पंचविसाव्या रौप्यमहोत्सवी पुण्यतिथी निमित्त भक्तीचा सागर आणि कुंभमेळ्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. केवळ सेवाभाव असल्याने इथे भाविकांची मांदियाळी जमली असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले तर भवसागर तरुण जाण्याचे तंत्र माऊली दादांनी जगाला दिले. माऊली दादांनी कधीच भेदभाव केला नाही. माऊलींची सेवा करण्याचं भाग्य प्रदीप मिश्रा यांना लाभले असे प्रतिपादन ह.भ.प.रामराव ढोक महाराज यांनी केले. माऊली दादा यांच्या पुण्यतिथी निमित्त गुलालाचे किर्तन करताना ते बोलत होते.**

यावेळी प्रमुख उपस्थितीत महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, महंत महादेव महाराज चाकरवाडीकर, ह.भ.प.नारायण महाराज उत्तरेश्वर पिंपरीकर, ह.भ.प.रामभाऊ महाराज काजळे, ह.भ.प.नाना महाराज कदम, ह.भ.प.सुरेश महाराज जाधव, ह.भ.प.विठ्ठल महाराज आंधळे, शिवानंद महाराज गिरी, दिनकर कदम, अरुण डाके, विलास बडगे, गंगाधर घुमरे, सखाराम मस्के, तानाजी कदम, नवनाथ कुलकर्णी, अरुण बोगांणे, नानासाहेब काकडे पाटील यांच्यासह लाखो भावीक भक्तांची उपस्थिती होती. बीड जिल्ह्यातील श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे विसाव्या शतकातील महान संत विभुती ज्ञानेश्वर माऊली दादा यांच्या रोप्य महोत्सवी पुण्यतिथीनिमित्त माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांची उपस्थिती होती. यावेळी त्यांच्या हस्ते माऊलीच्या समाधीची आरती करण्यात आली तसेच प्रसिद्ध



शिवकथाकार प्रदीप मिश्रा यांचे स्वागत करून माजी मंत्री क्षीरसागर यांनी आशिर्वाद घेतले. कीर्तन प्रसंगी बोलताना ते म्हणाले की, संत माऊलीच्या पुण्यतिथीला दर वर्षी भक्तांचा मोठा संगम याठिकाणी पहायला मिळतो. यावर्षी तर कुंभमेळ्याचे स्वरूप दिसू लागले आहे. लाखो भाविक कथा श्रवणासाठी इथे आले रामायणाचार्य रामराव ढोक महाराज २५ वर्षांपासून अखंडितपणे सेवा करत आहेत. सुरताल आणि भक्तीचा महापूर लोटला आहे. श्रीक्षेत्र चाकरवाडीला पंढरीच्या वाळवंटाचे स्वरूप आले आहे. माऊली बालाघाटाचे आध्यात्मिक वैभव आहे. माऊलींनी सोपा मार्ग सांगितला, अंधश्रध्दे पासून दूर करण्याचं काम माऊलीदादांनी केले आहे. जात ना पुछो साधूकी! देखो उसका ग्यान.असा दोहा सांगितला ते म्हणाले की, इथे अनेक त्रासातून आणि संकटातून मुक्त होणारे भाविक येतात, वारकरी संप्रदाय हा फक्त भक्तीच्या मार्गावर चालतो हे माऊली प्रत्येकवेळी सांगत असत. त्यामुळे इथे प्रत्येक जातीधर्माचा भाविक जोडला गेला आहे. महिन्याची वारी करणारे हजारो भाविक आहेत. इथे सेवेकर्याची प्रथा खूप मोठी आहे असे सांगून त्यांनी माऊलीच्या चरणी अभिवादन केले. यावेळी उत्सवात गुलालाचे कीर्तन करताना रामराव महाराज ढोक यांनी संत सेना महाराज यांच्या

उदार तुम्ही संत। मायबाप कृपावंत ।।१।।

या अभंगावर सुंदर चिंतन मांडले यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की, श्री क्षेत्र चाकरवाडीत आज भव्य दिव्य सोहळा होत आहे. सुंदर ऐश्वर्य संपन्न सोहळा होत आहे. पुण्य करणार्याची पुण्यतिथी होते. परोपकार, पुण्य आणि पाप दुसर्याला पिडा करणे आहे. माऊली दादा यांनी जगाला भवसागर तरुण जाण्याचे तंत्र दिले असे महाराज म्हणाले. यावेळी साथ संगत महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध मृदंग वादक राम महाराज काजळे, गायनाचार्य संतोष महाराज सुंबळे, अभिमान महाराज ढाकणे, भारत महाराज मुरकुटे, मुंडे महाराज, माऊली महाराज आवटे, सतीश महाराज जाधव यांच्यासह महाराष्ट्रातील नामांकित गायक वादक मंडळी उपस्थित होते.



**पिंपळवंडी:-वटसावित्री हा सण सौभाग्यवती स्त्रियांकडून पतीच्या दिर्घायुष्यासाठी व्रत म्हणून पारंपारिक पद्धतीने साजरा केला जातो.या दिवशी वडाच्या झाडाची पूजा करून व्रत पूर्ण केले जाते.वटपौर्णिमेच्या दिवशी वडाची पूजा केल्याने अखंड सौभाग्यसह जीवनात अपार सुख आणि संपत्ती प्राप्त होते अशी श्रद्धा आहे.दि.१० मंगळवार रोजी पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथेही हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला.यावेळी महिला मोठ्या संख्येने सहभागी होऊन त्यांनी वडाच्या झाडाभोवती दोरा गुंडाळून फेरे घेतले.आणि पतीच्या दिर्घायुष्यासाठी प्रार्थना केली.**

## रोजेकर कुटुंबाला गोविंद केकान यांचा आधार

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील चाटगाव येथील बाबासाहेब रोजेकर यांचे अपघातात अकाली निधन झाले. या अपघातात त्याचा मुलगा गणेश हा गंभीर जखमी झाला. त्याच्यावर बीड येथील खाजगी रुग्णालयात उपचार चालू आहेत. बाबासाहेब याची पत्नी अनिता ही सहा महिन्यांपूर्वी दुर्धर आजाराने मृत्यूमुखी पडली. बाबासाहेब रोजेकर यांना वयोवृद्ध आई, वैभव व गणेश हे दोन शाळकरी मुले आहेत. रोजेकर कुटुंबावर अस्मानी संकट ओढावले आहे. याची दखल घेत चाटगाव ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून गणेशच्या उपचारासाठी पैसे जमवले आहेत. मयत बाबासाहेब रोजेकर याची आई सोजरबाई (वय ७५ वर्ष) हि सतत आजारी असते.येथील उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते गोविंद महादेव केकान यांनी सामाजिक बांधिलकी जपत सोजरबाई व रोजेकर भावंडांना आर्थिक व आरोग्याबाबत वेळोवेळी मदत करणार असल्याचे जाहीर केले. असून दहा हजार रुपये नगदी स्वरूपात मंगळवारी वैभव रोजेकर कडे सुपुर्द केले.



## जय जवान माध्यमिक विद्यालयात धरती आबा बिरसा मुंडा स्मृतिदिन साजरा

**वडवणी । प्रतिनिधी**

जय जवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कवडगाव येथे दि.०९/०६/२०२५ रोजी आदिवासी महान वीर जल जंगल जमीन हक्क संघर्ष करणारे धरती आबा बिरसा मुंडा यांच्या स्मृति दिना निम्मित त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. या वेळी गावातील सर्व मान्यवर ग्रामस्थ उपस्थित होते तसेच विद्यालयाचे प्राचार्य श्री. सारोक्ते डी जी सर तसेच सर्व विद्यार्थी, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद आदी सर्व उपस्थित होते. ते भारतातील महान आदिवासी स्वातंत्र्यसैनिक आणि समाज सुधारकां पैकी ◀◀ पान ३ वर



## महायुती सरकारच्या फसव्या घोषणे विरोधात शिवसेनेचा उद्या रस्ता रोको

### शेतकरी व लाडक्या बहिणींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे -उल्हास गिराम यांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

महायुती सरकार कडुन सत्तेत येण्यापूर्वी शेतकऱ्यांना कर्जमाफी सह अनेक प्रलोभने दाखवली होती, तसेच लाडक्या बहिणींना पण १५०० रुपया वरून २१०० रुपये महिना करू असे आश्वासन दिलेले होते, मात्र सत्तेत आल्यानंतर या आश्वासनाचा महायुती सरकारला विसर पडला. सत्तेवर आल्या नंतर महायुती सरकार सातत्याने शेतकऱ्यावर अन्याय करत असून जुलमी धोरणे राबवून देशोधडीला लावण्याचे काम करत आहे. निवडणुकी पूर्वी ज्या फसव्या घोषणा केल्या त्या विरोधात उद्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी सांगितले आहे.



अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना अद्याप पर्यंत नुकसान भरपाई मिळाली नाही, मोफत वीज, पाणंद रस्ते, हर घर जल, हर घर छत या आश्वासनाकडे ही महायुती सरकारने कानाडोळा करीत दुर्लक्ष केले आहे, म्हणून या विसर भोळ्या सरकारला झोपेतून जागे करण्यासाठी शिवसेना पक्षाकडून '' क्या हुआ तेरा वादा '' असा जाब विचारून आंदोलन करण्यात येत आहे त्याचाच एक भाग शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने उद्या बुधवार दिनांक रोजी, सकाळी ११ वाजता, महालक्ष्मी चौक बीड बायपास जवळ संभाजी महाराज यांच्या पुतळ्या शेजारी, भव्य रस्ता ◀◀ पान ३ वर

## लग्न जुळविण्यातून आर्थिक फसवणूकीचे प्रकार वाढले

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

विवाह जुळवतो आणि हमखास लग्न लावून देतो असे म्हणत एजंटांकडून सुशिक्षित नोकरदारसह सधन शेतकरी तरुणांची उघडपणे आर्थिक फसवणूक केली जात आहे.

नाव नोंदणी, मोबाइल नंबर, मोबाइल रिचार्ज व ऍडव्हॉन्स फोन पे च्या नावाखाली पैसे घेतल्यावर हे एजंट थेट संपर्कच तोडत आहेत. लग्नाच्या आशेवर वाट पाहणाऱ्या अनेक तरुणांना मी थोड्याच वेळात बोलतो हा एकमेव बहाणा ऐकायला मिळतो आणि शेवटी ते फसवणुकीचे बळी ठरतात. विवाहेच्छुक तरुणांना स्थळ दाखवण्याचे आमिष,बायोडेटा गोळा करणे,फोटो

घेणे,नोकरीचे ऑर्डर घेणे, कार्यालयाचे नाव व पत्त्यासह मोबाइल नंबर घेणे, बोलणी करण्याचे नाटक आणि त्यासाठी नोंदणी म्हणून



ठरावीक दोन हजार रुपये च्या पुढे शुल्क आकारणे, इतक्यावरच हे प्रकार थांबत नाहीत. काही एजंट ऍडव्हॉन्स म्हणून हजार-दोन हजार रुपये उकळतात. आणि मोबाइल रिचार्ज करण्यासाठी सांगितले जाते. मात्र,रक्कम मिळताच हे एजंट गायब होतात. त्यांच्या संपर्कासाठी पुन्हा पुन्हा फोन केला तरी मी गाडीवर आहे व बाहेर गावी सोयरिक दाखविण्यासाठी जात आहे. एवढेच उत्तर मिळते आणि पुढे ते कॉल उचलणे बंद करतात. काही सुशिक्षित पर्मनंट नोकरदार तरुणांना एजंटने स्थळ दाखवण्यापूर्वीच बहार होत असल्याचे सांगितले. सुरुवातीच्या टप्प्यात मोठमोठ्या स्थळांची माहिती दिली जाते. आम्ही आतापर्यंत अमुक अमुक लग्न जुळवले, अशी माहितीही दिली जाते. पण प्रत्यक्षात कोणतेही स्थळ दाखवले जात नाही. दाखविले तरी मोठे हायफाय अथवा एकदम खालील कसेबसे दाखवून पैसे उकळले जातात. मोठी आश्वासने देऊन शेवटी अपेक्षाभंग करणारा हा प्रकार म्हणजे एक बडा घर पोकळ वासा असा ठरतो. ते सरकार मान्यअधिकृत नोंदणी करणाऱ्या विवाह संस्थाकडे न जाता अशा फसवणुक करणाऱ्यांकडे संपर्क करतात व त्यांचा फसवणूक होते. विवाहेच्छुक तरुण, त्यांचे आई-वडील, भाऊ, बहीण, मामा अशा प्रकाराला कंटाळून गेल्याचे चित्र आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज महाराज स्व-समाधान शिबिराचे शुक्रवारी आयोजन - तहसीलदार रुईकर

माजलगाव । प्रतिनिधी

येथील तहसील कार्यालय माजलगाव यांच्या मार्फत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन दिनांक १३ जून शुक्रवार रोजी सकाळी १०: ३० वाजता येथील मॉ.वैष्णवी मंगल कार्यालय या ठिकाणी आयोजन करण्यात आलेले आहे.सदर होत असलेल्या समाधान शिबिरात तहसील कार्यालय मार्फत



दिल्या जाणाऱ्या विविध सेवा व विविध प्रमाणपत्र वाटप करण्यात येणार आहेत.जसे की उत्पन्न दाखले, जात प्रमाणपत्र, संजय गांधी निराधार योजना व श्रावण बाळ राज्य सेवानिवृत्ती योजना मंजुरी पत्र व नवीन फॉर्म भरून घेणे, राशन कार्ड वाटप, शेतकरी यांचे फार्मर आयडी तयार करणे, ई. तसेच विविध योजनाची माहिती शेतकरी वर्गाला देण्यात येणार आहे..तरी तालुक्यातील शेतकरी / नागरिकांनी सदर समाधान शिबिराचा लाभ घ्यावा,असे आवाहन येथील तहसीलदार संतोष रुईकर यांनी केले आहे.

## चळवळ कशी उभी राहते हे समजून घेण्यासाठी नव्या पिढीने सम्यक पांथस्थ आबा हा ग्रंथ अभ्यासावा - ज्येष्ठ विचारवंत ज.वि.पवार

### प्रा.एस.के.जोगदंड यांच्या जीवनचरित्रावरील गौरव ग्रंथाचे अंबाजोगाईत प्रकाशन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

एकेकाळच्या दलित युवक आघाडीचे लढाऊ शिलेदार, वंचित बहुजन आघाडीचे जेष्ठ नेते, पुरोगामी परिवर्तनवादी चळवळीतील कार्यकर्त्यांचे प्रेरणास्थान आणि अंबाजोगाई येथील योगेश्वरी शिक्षण संस्थेतील इंग्रजी विषयाचे सेवानिवृत्त प्रा.एस.के.जोगदंड यांच्या जीवनचरित्रावरील सम्यक पांथस्थ आबा या गौरवग्रंथाचा प्रकाशन समारंभ मान्यवरांच्या हस्ते व प्रमुख उपस्थितीत रविवारी शहरातील विलासराव देशमुख न.प.सभागृह, अंबाजोगाई



येथे आयोजित करण्यात आला होता.

गौरवग्रंथ प्रकाशन समारंभाच्या अध्यक्षस्थानी डॉ.सुरेश खुरसाळे (माजी अध्यक्ष, योगेश्वरी शिक्षण संस्था.) हे होते. तर गौरवग्रंथाचे विमोचन ज.वि.पवार (ज्येष्ठ विचारवंत व आंबेडकरी चळवळीचे भाष्यकार, मुंबई.) यांच्या हस्ते व मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत रविवार, दिनांक ८ जुन रोजी करण्यात आले. तसेच यावेळी गौरवग्रंथावर भाष्यकार म्हणून बोलताना प्रसिद्ध साहित्यिक प्रा.डॉ.प्रल्हाद लुलेकर ◀◀ पान ३ वर

## तथाकथित शिष्याकडून जीवे मारण्याची धमकी

### संरक्षण देण्याची ह.भ.प. रतन महाराज सासुरेकर यांची मागणी

बीड दि.११ (प्रतिनिधी): एकनाथ महाराज मठ संस्थान सासुरा येथील तथाकथित शिष्यव्वकेशव गीते हा मारहाण करून जीवे मारण्याची धमकी देत आहे. सदर याप्रकरणी चौकशी करून कारवाई करण्यात यावी आणि आपल्याला संरक्षण देण्यात यावे अशी मागणी महाराज मठाधिपती एकनाथ महाराज



मठ, सासुरा यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक यांना केली आहे.

या संदर्भात दिनांक १० जून २०२५ रोजी जिल्हा पोलीस अधीक्षक यांना ह.भ.प. रतन महाराज, एकनाथ संस्थान, सासुरा व त्यांचे सुमारे १०० भाविकांनी जिल्हा पोलीस अधीक्षक यांना भेटून निवेदन दिले आहे. या निवेदनात म्हटले आहे की, गेल्या ७० वर्षापासून रतन महाराज संस्थांनच्या माध्यमातून परिसरातील जनतेची प्रवचन, कीर्तनाच्या माध्यमातून समाजसेवा करत आहेत. सुमारे १०० वर्षाचे वय झाले असून सासुरा ◀◀ पान ३ वर

## शेतकऱ्यांना, कष्टकऱ्यांना वाऱ्यावर सोडणारे सरकार झोपेचे सोंग घेतय -राजेभाऊ फड

### माजी मंत्री बच्चूभाऊ कडू यांच्या आंदोलनाला समर्थनपत्र देऊन दर्शविला पाठिंबा

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

राज्यात दरवर्षी हजारो शेतकरी आत्महत्या करत आहेत. कष्टकरी आणि कामगार वर्गाच्या हाताला रोजगार उपलब्ध नाही. अपंग, विधवा, परित्यक्ता आणि निराश्रितांचे प्रश्न मोठ्या प्रमाणावर प्रलंबित असल्याने त्यांचे बेहाल आहेत. पालनकर्ते शासनच निद्रिस्थ अवस्थेत असेल तर जनतेकडे कोण लक्ष देणार? निवडणुकांच्या काळात मोठमोठ्या सभा गाजवून जनतेवर आश्वासनांचा भडिमार करतात, मात्र निवडून आल्यानंतर याच महाराष्ट्रातील जनतेला वाऱ्यावर सोडून दिले जाते. आज माजी मंत्री बच्चूभाऊ कडू यांना याच सर्व प्रश्नांवर आंदोलन करावे लागणे हेच या जनतेची फसगत करून निवडून आलेल्या बेईमान सरकारचे अपयश असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी म्हटले आहे. त्यांनी माजी राज्यमंत्री बच्चूभाऊ कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाला पाठिंबा दर्शवणारे पत्र लिहून त्यांना आपल्या भावना कळवल्या आहेत.



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष तथा माजी राज्यमंत्री बच्चूभाऊ कडू यांच्या सुरू असलेल्या अन्नत्याग आंदोलनाला परळी विधानसभा मतदारसंघातील पक्षाचा संपूर्ण पाठिंबा ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# प्रभाग रचनेचे काम सुरू करा; नगरविकास विभागाचे महापालिकेला आदेश

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे बिगूल वाजले असून, राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार नगरविकास विभागाने महापालिकांसाठी प्रभाग रचना करण्याचे आदेश काढले आहेत. त्यानुसार, अ, ब, क वर्ग महापालिकांसाठी ४ सदस्यांचा प्रभाग असणार आहे. प्रभागाचे प्रारूप तयार करणे आणि सदस्यसंख्या निश्चित करून प्रभाग रचनेचे प्रारूप तयार करण्याची जबाबदारी महापालिका आयुक्तांवर असणार आहे. नगरविकास विभागाकडून मंगळवारी याबाबतचे आदेश काढण्यात आले आहेत. त्यामुळे मागील तीन वर्षांपासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या प्रक्रियेला अखेर सुरुवात झाली आहे.

या प्रभाग रचनेसाठी सप्टेंबर २०२२ मध्ये निश्चित केलेली कमाल आणि किमान सदस्य संख्या कायम असणार आहे. शासनाच्या या आदेशानुसार राज्यातील अ वर्गातील पुणे आणि नागपूर, तर ब वर्ग असलेल्या ठाणे, नाशिक आणि पिंपरी-चिंचवड, तर क वर्ग असलेल्या नवी मुंबई, वसई- विरार, छत्रपती संभाजीनगर आणि कल्याण डोंबविली महापालिकांचा




समावेश आहे. ड वर्गातील १९ महापालिकांचा समावेश आहे. ही प्रभाग रचना करण्यासाठी शासनाकडून नियामवली देण्यात आली असून, त्यानुसारच प्रभाग रचना करणे अपेक्षित आहे. त्यासाठी नजीकच्या जाहीर झालेल्या लोकसंख्येचा आधार घेतला जाणार आहे. त्यानुसार प्रारूप प्रभाग रचना करून महापालिका आयुक्तांनी ती निवडणूक आयोगास सादर करायची आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांप्रमाणेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पारदर्शकपणे पार पाडण्याच्या सूचना सर्व आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

शेवटचा प्रभाग ३ किंवा ५ सदस्यांचा

प्रभाग निश्चित करताना सदस्यसंख्या सप्टेंबर २०२२ च्या आदेशाप्रमाणे असणार आहे. या आदेशात कमाल आणि किमान किती सदस्य असावेत, हे निश्चित केले आहे. मात्र, त्याच वेळी सर्व प्रभाग चार सदस्यांचे करायचे असून, ते होत नसल्यास एक प्रभाग तीन सदस्यांचा, तर एक प्रभाग ५ सदस्यांचा करायचा आहे. दोन प्रभाग प्रत्येकी ३ सदस्यांचे करण्याची मुभा देण्यात आली आहे. मात्र, ती करताना भौगोलिक सलगता राखणे, नागरिकांची गैरसोय टाळण्याच्या सूचना दिल्या आहेत. प्रभागाची लोकसंख्या निश्चित करण्याचे निकषही महापालिकेस देण्यात आले आहेत. प्रभाग रचना उत्तरेकडून सुरू करून ती उत्तर पूर्वेकडून पश्चिम आणि शेवट दक्षिणेकडे करण्याच्या सूचना आहेत, तर सीमारेषा मोठे रस्ते, गल्ल्या, नद्या, नाले, डोंगर रस्ते, रेल्वे रूळ, फ्लाय ओव्हर अशा मर्यादा घेऊन निश्चित केल्या जाणार आहेत. प्रभागांचे नकाशे गुगल मॅपवर तयार केले जाणार आहेत.

असा असतील प्रभाग रचनेचे टप्पे

– प्रारूप प्रभाग रचना करून राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यते पाठविणे – महापालिका आयुक्त – प्रारूप रचनेस मान्यता देणे– राज्य निवडणूक आयुक्त – प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध करणे – महापालिका आयुक्त

– प्रभाग रचनेवर हरकती आणि सूचना घेणे – प्राधिकृत अधिकारी – अंतिम प्रस्ताव निवडणूक आयोगास पाठविणे – प्रधिकृत अधिकारी (आयुक्तांच्या मार्फत) – अंतिम रचनेस मान्यता देणे – निवडणूक आयोग

– अंतिम रचना जाहीर करणे – महापालिका आयु

# पारोडी गावात स्माईल फाउंडेशनकडून डेंग्यू जनजागृतीसाठी आरोग्य कार्यक्रम संपन्न




**पुणे । प्रतिनिधी**

निमोणे- पारोडी, सातकरवाडी, शिवतक्रार व म्हाळुंगी गावातील नागरिकांमध्ये डेंग्यू विषयी जनजागृती करण्यासाठी स्माईल फाउंडेशन, दिल्ली व फिलिप्स शिरुर यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष आरोग्य जनजागृती कार्यक्रम नुकताच पार पडला.

या कार्यक्रमात कम्युनिटी मोबिलायझर प्रियांका मोहिते यांनी डेंग्यू आजाराच्या लक्षणांपासून ते प्रतिबंधात्मक उपायांपर्यंत सविस्तर माहिती दिली.त्या म्हणाल्या की, डेंग्यू हा एडीस डासांद्वारे पसरणारा विषाणुजन्य आजार असुन याच्या लक्षणांमध्ये उच्च ताप, डोकेदुखी, डोळ्यांमागे वेदना, स्नायू आणि सांधेदुखी, मळमळ व त्वचेवर पुरळ दिसून येतात.

यासाठी प्रतिबंधक उपायांमध्ये साचलेल्या पाण्याचे नियमित निर्जंतुकीकरण, पाण्याच्या टाक्या, भांडी झाकणे, खिडक्यांना जाळ्या बसवणे, लांब बाह्यांचे कपडे घालणे, कीटकनाशकांचा वापर,मच्छरदानीचा वापर करणे आवश्यक आहे.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी स्माईल फाउंडेशनचे वरिष्ठ स्वास्थ्य व्यवस्थापक अमिल यांच्या सूचनेनुसार आणि सामुदायिक आरोग्य अधिकारी के एम सोनटक्के यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. यावेळी अनेक मान्यवर ग्रामस्थ उपस्थित होते.

# नवीन तंत्रज्ञान, कमी खर्च आणि जास्त उत्पादनाची गुरुकिल्ली! उरळगावमध्ये ऊस परिसंवादाला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पुणे । प्रतिनिधी**

निमोणे – महाराष्ट्र शासन कृषी विभाग आणि ग्रामपंचायत कार्यालय उरळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने ऊस पिक परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या परिसंवादात प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. संदीप घोले, राजेश थोरात आणि योगेश गाडे उपस्थित होते.





डॉ. घोले यांनी ऊस लागवडीत वापरल्या जाणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती दिली. त्यांनी तण नियंत्रण, हुमणी नियंत्रण, पाचट व्यवस्थापन, जमिनीच्या सुपिकतेनुसार खत व्यवस्थापन आणि निविष्टांचा योग्य वापर याबाबत सखोल मार्गदर्शन केले. राजेश थोरात यांनी एकरी खर्च कसा कमी करावा याबाबत शेतकऱ्यांना उपयुक्त टिप्स दिल्या. तर योगेश गाडे यांनी एक डोळा ऊस लागवड तसेच कांदा रोपवाटिका संदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले.

तसेच मंडळ कृषी अधिकारी कांतीलाल वीर यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली. कृषी क्षेत्रात एआय (-ख) चा वाढता उपयोग आणि त्याचे भविष्यातील महत्त्व यावरही परिसंवादात चर्चा झाली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावचे सरपंच स्वप्निल गिरमकर होते. यावेळी सचिन पाचुंदकर, संतोष सात्रस, अशोक कोळपे, राजेंद्र गिरमकर, पोपट गिरमकर, सोमनाथ बांडे, मोहन सात्रस, सागर गिरमकर, बापू कोळपे, उप कृषी अधिकारी शिवाजी गोरे, सहायक कृषी अधिकारी संतोष गदादे, विशाल भोसले, योगेश गाडे (गुनाट), प्रफुल्ल सोनवणे (निर्वी), सेवा निवृत्त कृषी अधिकारी कैलास सात्रस आदी मान्यवर उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सरपंच स्वप्निल गिरमकर, पोपट कुदळे, तात्या सात्रस आणि जयवंत भगत (सहायक कृषी अधिकारी) यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयवंत भगत यांनी केले तर आभार राजेंद्र गिरमकर यांनी मानले.

# न्हावरा फाटा व सतरा कमान चौकात सौर ऊर्जेवर चालणारे सिग्नल: अपघात रोखण्यासाठी शिरूर पोलिसांचा अभिनव पुढाकार

**शिरूर । प्रतिनिधी**

शिरूर पोलीस स्टेशनच्या हद्दीतून जाणारा पुणे-आहिल्यानगर राष्ट्रीय महामार्ग हा अत्यंत वर्दळीचा आणि वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाचा मार्ग आहे. या महामार्गावर मौजे न्हावरा फाटा आणि सतरा कमान चौक हे अपघातप्रवण ठिकाणे असून, याठिकाणी वारंवार अपघात होत असल्याची नोंद आहे.



न्हावरा फाटा परिसरातून आहिल्यानगरकडून येणारी अवजड वाहतूक ही उतार असल्यामुळे जोरात येते. त्याच ठिकाणी चौक आणि रोड क्रॉसिंग एकत्र असल्याने वाहनचालकांना अंदाज न आल्याने अनेकदा धोकादायक परिस्थिती निर्माण होते. विशेषतः रात्रीच्या वेळी अंधारामुळे अपघात होण्याचे प्रमाण अधिक आहे. तसेच सतरा कमान चौकातही पुणेकडून येणाऱ्या वाहनांचा वेग उतारामुळे वाढतो आणि चौकाचा अंदाज न आल्यामुळे तीव्र अपघात घडतात.

या पार्श्वभूमीवर शिरूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संदेश कजळे यांनी स्वतः दोन्ही ठिकाणी भेट देऊन पाहणी केली. अपघात रोखण्यासाठी त्वरित उपाययोजना करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. त्यांनी वाहनचालकांना रात्रीच्या वेळी योग्य सूचना मिळाव्यात यासाठी या ठिकाणी सौरऊर्जेवर चालणारे सिग्नल बसवण्याचा प्रस्ताव पुढे नेला.

या उपक्रमात सामाजिक उत्तरदायित्व जपत, खत्रङ्ग कंपनी (मौजे करडे, ता. शिरूर, जि. पुणे) यांनी पुढाकार घेतला. त्यांच्या एच.आर. हेड काशीराम मेस्री यांच्या माध्यमातून न्हावरा फाटा आणि सतरा कमान चौक या दोन्ही ठिकाणी एकूण चार सौरऊर्जेवर चालणारे सिग्नल आज बसवण्यात आले. नागरिकांतून कौतुकाचा वर्षाव या उपक्रमामुळे रात्रीच्या वेळी चौकाचा अंदाज घेणे वाहनचालकांसाठी सोपे होणार असून, अपघातांची शक्यता मोठ्या प्रमाणात कमी होईल. शिरूर पोलिसांनी केलेल्या या सकारात्मक आणि उपयुक्त पावलामुळे नागरिकांतून कौतुकाचा वर्षाव होत आहे.वाहतूक सुरक्षेच्या दृष्टीने हा एक अनुकरणीय आदर्श ठरणार आहे.

# विजेच्या धक्क्याने शाळकरी मुलीचे मृत्यू प्रकरण: सराईत शिवम आंदेकरसह साथीदारांविरुद्ध दोन स्वतंत्र गुन्हे दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

नाना पेठेत विजेच्या धक्क्याने शाळकरी मुलीच्या मृत्यू प्रकरणात आंदेकर टोळीतील सराइत शिवम आंदेकरसह साथीदारांविरुद्ध दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. फलकासाठी घेतलेला बेकायदा वीजजोड, तसेच शाळकरी मुलीच्या मृत्यू प्रकरणात आंदेकरविरुद्ध समर्थ पोलिसांनी कारवाई केली. मासे विक्रेत्याला धमकावून खंडणी मागितल्याप्रकरणी शिवम आंदेकरसह साथीदारांविरुद्ध नुकताच गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नाना पेठेतील डोके तालीम चौकात गेल्या आठवड्यात फलकाच्या खांबात उतरलेल्या विद्युत प्रवाहाच्या धक्क्याने सायली डंबे (८) हिचा मृत्यू झाला होता. या घटनेत एक मुलगा जखमी झाला होता. सुरुवातीला याप्रकरणात समर्थ पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू अशी नोंद करण्यात आली होती. डोके तालीम चौकात लोखंडी फलक लावण्यात आला आहे. या फलकात दिवे लावले होते. हा फलक लावण्यासाठी महापालिकेची परवानगी घेण्यात आली नव्हती. जवळच असलेल्या महावितरणच्या खांबातून बेकायदा वीजजोड घेऊन तेथे दिवे लावण्यात आल्याचे तपासात उघडकीस आले.

घटनेच्या दिवशी विद्युत प्रवाह फलक उभा करण्यासाठी लावलेल्या खांबात उतरला. त्या वेळी सायली डंबे तेथे खेळत होती. तिचा हात खांबाला लागल्याने विजेच्या धक्क्याने तिचा मृत्यू झाला. या फलकासाठी बेकायदा वीजजोड घेण्यात आला होता. तसेच, फलकातील खांबात विद्युत प्रवाह उतरल्याने सायलीचा मृत्यू झाल्याचे उघडकीस आले. त्यानंतर पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला, अशी माहिती समर्थ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते यांनी दिली.

वीज चोरी प्रकरणात स्वतंत्र गुन्हा


महावितरणच्या खांबावरून बेकायदा वीजजोड घेतल्याप्रकरणी शिवम आंदेकर याच्यासह साथीदारांविरुद्ध समर्थ पोलीस ठाण्यात स्वतंत्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महावितरणकडून देण्यात आलेल्या तक्रारीनुसार भारतीय विद्युत कायदा कलम १३५ अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

# यूपीएससी; विनामूल्य प्रशिक्षणासाठी सीईटी

**पुणे । प्रतिनिधी**

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी पूर्व परीक्षेसाठी पूर्णवेळ विनामूल्य प्रशिक्षणासाठी पात्र उमेदवारांची निवड करण्यात येणार आहे. त्यासाठी सामाइक प्रवेश परीक्षा (सीईटी) २७ जुलै रोजी होणार आहे. या परीक्षेसाठी उमेदवारांना २६ जूनपर्यंत अर्ज करावा लागेल.

उच्च शिक्षण विभागांतर्गत राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) संचलित डॉ. आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, पुणे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका संचलित सावित्रीबाई फुले अकादमी पुणे या संस्थामार्फत हे विनामूल्य प्रशिक्षण देण्यात येणार आहे.




उमेदवारांचे प्रवेश हे लेखी परीक्षा आणि मुलाखतीतील गुणांच्या आधारे ठरवले जाणार असून मुलाखतीचे वेळापत्रक परीक्षेनंतर जाहीर केले जाईल. सीईटीचा अंतिम निकाल जाहीर झाल्यानंतर उमेदवारांनी प्रवेशासाठीच्या संकेतस्थळावर नोंदणी करून त्यांच्या पसंतीचे प्रशिक्षण केंद्र प्रवेशासाठी निवडायचे आहे. प्रवेश प्रक्रियेबद्दलची सर्व माहिती व ऑनलाइन अर्ज भरण्याविषयी सूचना्.िळरल्.ीस.ळप या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याची माहिती राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्थेच्या संचालक डॉ. भावना पाटोळे यांनी दिली.

# महापालिका निवडणुकीसाठी शिंदे गट सज्ज; धंगेकरांचा स्वबळाचा नारा

**पुणे । प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांसाठी सर्वच राजकीय पक्षांनी कंबर कसली आहे. पक्षप्रमुखांपासून पदाधिकारी, कार्यकर्तेही तयार झाले आहेत. 'स्वबळावर लढण्याचा' नारा देत शिंदे गटाच्या शिवसेनेनेही तयारी सुरू केली आहे.

महायुती होणार की नाही, याबाबत अद्याप स्पष्टता नसली तरी, प्रत्येक पक्ष आपापल्या स्तरावर निवडणुकीची तयारी सुरू ठेवत आहे. पुण्यातही शिंदे गटाने सर्वच महापालिका जागांवर लक्ष केंद्रित करत मोर्चेबांधणी सुरू केली आहे. वेळ पडल्यास आम्ही स्वबळावर निवडणूक लढवण्यास तयार आहोत, असे स्पष्ट संकेत शिंदे गटाचे पुण्याचे महानगरप्रमुख रवींद्र धंगेकर (ठरींळपवीर उहरपसशज्ञरी) यांनी दिले आहेत.



पुणे महापालिकेच्या आगामी निवडणुकांसंदर्भात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली. या बैठकीत शिंदे गटाचे महानगरप्रमुख रवींद्र धंगेकर यांनी पक्षाच्या तयारीबाबत माहिती दिली. या वेळी कार्यकर्त्यांनी शिंदे साहेबांना पुण्यात सेनेचा वाढता प्रभाव, माजी नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांचा पक्षात प्रवेश करण्याचा कल याबाबत माहिती दिली. अनेक माजी नगरसेवक आणि पदाधिकारी शिंदे गटात सहभागी होण्यासाठी उत्सुक असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

धंगेकर म्हणाले की, 'पुणे महापालिकेतील सर्वच्या सर्व जागांवर लढण्याची आमची तयारी सुरू आहे. प्रत्येक प्रभागात उमेदवार उभे करण्याच्या दृष्टीने नियोजन सुरू असून, एकनाथ शिंदे साहेबांनी आदेश दिल्यास आम्ही सर्व जागा स्वबळावर लढण्यास सज्ज आहोत.'

पुण्यातील कार्यकर्ते १६५ जागांवर लढण्यासाठ सक्षम आहेत. सैन्य तयार आहे, फक्त आपल्या आदेशाची वाट पाहत आहेत. पक्षप्रवेशासाठी अनेक लोक संपर्क करत आहेत. बैठका देखील सुरू आहेत. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत जाण्यासाठी अनेक जण उत्सुक आबेत. त्यामुळे भविष्यात एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश पाहायला मिळतील, अशी माहिती एकनाथ शिंदे यांना देण्यात आली आहे.

# 'पुणे महापालिकेतील समाविष्ट गावांना तातडीने आवश्यक पाणी पुरवठा करा'; सभापती प्रा. राम शिंदेंच्या सूचना



**पुणे । प्रतिनिधी**

महापालिकेने २०१८ पासून समान पाणी पुरवठा योजना आणली. मात्र, अद्याप कात्रज, कोंढवा, येवलेवाडी, पिसोळी या विभागात अपुऱ्या प्रमाणात पाणीपुरवठा होत आहे. ही बाब गंभीर असून, पुणे महापालिका हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांना तातडीने योग्य प्रमाणात पाणी पुरवठा होईल, या दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी दिले.

विधानपरिषदेचे सदस्य आमदार योगेश टिळेकर यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२५ मध्ये 'लक्षवेधी'च्या माध्यमातून या प्रश्नाकडे लक्ष वेधले होते. यासंदर्भात सभापती प्रा. शिंदे यांनी आपल्या दालनात बैठक घेऊन याबाबत निर्देश दिले. या बैठकीस विधानपरिषदेचे सदस्य आमदार योगेश टिळेकर, विधानमंडळाचे सचिव डॉ.विलास आठवले, पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम (दूरदृष्य प्रणालीद्वारे), अतिरिक्त महापालिका आयुक्त ओमप्रकाश दिवटे, उप सचिव नगरविकास प्रियंका छापवाले उपस्थित होते.

# शेतात जाण्यास रस्ता नाही... मग शेतीच का ठेवायची? शेतकऱ्याचं पाच एकर द्राक्षांचं बलिदान

**पुणे । प्रतिनिधी**

निमोणे – निजाम आणि इंग्रज काळापासुन अस्तित्वात असलेला ३३ फूट रुंदीचा दोन गावांना जोडणारा सार्वजनिक शिवरस्ता आज अतिक्रमणाच्या विळख्यात सापडला असुन त्याचा फटका थेट शेतकऱ्यांच्या उपजीविकेला बसू लागला आहे. या रस्त्यावर अतिक्रमण झाल्याने शेतीच्या मालकी हक्काचा पुरेपूर उपयोग न करता आल्याने एका शेतकऱ्याने अखेर वैतागून आपली पाच एकर द्राक्ष बागा तोडून टाकण्याचा टोकाचा निर्णय घेतला आहे.



निमोणे येथील गट नंबर १०७७ आणि गुनाट येथील गट नंबर ४७० या दोन गटां दरम्यानचा ऐतिहासिक रस्ता सन १९९९ पासून स्थानिक भूमाफियांच्या अतिक्रमणामुळे बंद झाला आहे. महसूल विभागाने या रस्त्याची दोन वेळा फेरचौकशी केली असून, तीन तहसीलदारांनी रस्ता मोकळा करण्याचे आदेशही काढले आहेत. परंतु आजतागायत या आदेशाची कोणतीही अंमलबजावणी झाली नाही.

या संदर्भात दोन्ही गावांच्या ग्रामपंचायतींनीही ठराव करून रस्ता मुक्त करण्याची मागणी केली आहे. मात्र तरीही प्रशासनाचे दुर्लक्ष कायम आहे. परिणामी, या रस्त्याअभावी संबंधित शेतकऱ्यांना त्यांच्या शेतापर्यंत पोहोचणे अशक्यप्राय बनले आहे. त्यामुळे शेतात पोहोचण्यासाठी पर्यायी आणि कायमस्वरुपी रस्ता उपलब्ध नसल्याने शेतीचे उत्पन्न तर बुडतेच आहे. शिवाय भविष्यातील नुकसानही टाळता येत नाही. त्यामुळे एका शेतकऱ्याने वैतागून पाच एकरची द्राक्ष बाग तोडून टाकण्याचा निर्णय घेतला आहे.

या प्रकरणी स्थानिक प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करुन अतिक्रमण हटवून रस्ता खुला करावा अशी मागणी शेतकरी नानासाहेब काळे यांनी केली आहे. अन्यथा या रस्त्याच्या प्रश्नावर लोकशाही मार्गाने लवकरच मोठे आंदोलन करणार असल्याचेही काळे यांनी सांगितले.

# शिरूर: साबळेवाडीत शासकीय मालमत्तेचे नुकसान; दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**शिरूर । प्रतिनिधी**

टाकळी हाजी (ता. शिरूर) येथील साबळेवाडी गावठाणात शासकीय मालमत्तेचे नुकसान केल्याप्रकरणी दोन व्यक्तींविरुद्ध शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ग्रामपंचायत टाकळी हाजीचे ग्रामविकास अधिकारी राजेंद्र खराडे (वय ५५) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून हा गुन्हा नोंदवला गेला.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ३ जून रोजी आरोपी भागा हरी भाईक आणि विश्वनाथ भागा भाईक (दोघेही रा. साबळेवाडी, ता. शिरूर) यांनी संगनमताने शासकीय खर्चातून उभारलेले तारांचे कंपाऊंड आणि चर तोडून नष्ट केले. या तोडफोडीमुळे सुमारे २४,६०० रुपये किमतीचे शासकीय मालमत्तेचे नुकसान झाल्याचा आरोप आहे. या प्रकरणी १० जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

या गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार शिवाजी बनकर करत असून, पोलीस उपनिरीक्षक संदेश केंजळे प्रभारी अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. शासकीय मालमत्तेचे नुकसान रोखण्यासाठी प्रशासन आणि पोलिसांकडून कठोर कारवाईची अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, शासकीय मालमत्तेच्या संरक्षणासाठी अधिक प्रभावी उपाययोजनांची गरज व्यक्त केली जात आहे.